
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २३१
www.ramprahar.com
◆ मंगळवार, १० मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

महाड नगरीत होणार साहित्याचा जागर/२
नारीशक्ती उत्सवातून महिलांना व्यासपीठ/६
'आरडीसीए'ची आता महिला प्रीमियर लीग/८

## विरोधकांना तोंड दाखवायला जागा उरलेली नाही : मुख्यमंत्री



**मुंबई** : शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर विरोधकांनी सोमवारी (दि. ९) विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता विरोधकांना तोंड दाखवायला जागा उरलेली नाही, अशा शब्दांत हल्लाबोल केला. मुख्यमंत्री म्हणाले, गिरे तो भी टांग उपर असे विरोधकांचे सुरू आहे. जनता विरोधकांसोबत नाही. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये जनतेने विरोधकांना जमीन दाखवली आहे. आम्ही निवडणुका जिंकण्याकरिता नाही, तर निवडणुका जिंकल्यानंतर कर्जमाफी केली आहे. त्यामुळे जनतेचा आमच्यावर विश्वास आहे. विरोधकांनी कितीही आंदोलन केले, तरी जनता त्यांच्यासोबत नाही, असा टोलाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी लगावला.

# आरोग्य योजनांतर्गत होणाऱ्या उपचारांचे दरपत्रक जाहीर करा

### आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची तारांकित प्रश्नाद्वारे मागणी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे तसेच हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड व बोन मॅरो प्रत्यारोपणासारख्या गंभीर व दुर्मिळ आजारांवरील उपचाराचा खर्च अधिक असल्याने अशा रुग्णांना अतिरिक्त आर्थिक सहाय्य देण्याबाबत राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या संदर्भात प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून राज्यातील रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात उपचार मिळावेत यासाठी या दोन्ही योजनांच्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या उपचारांचे दरपत्रक जाहीर करण्याची मागणी केली.




या प्रश्नावर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या उत्तरात म्हटले की, अवयव प्रत्यारोपणाच्या पाच लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च होणाऱ्या नऊ दुर्मिळ आजारांवरील उपचारांचा खर्च (रू.९.५ लाख ते २२ लाख) राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अधिनस्त असलेल्या राखीव निधीतून करण्यास शासन निर्णय क्र. समिती-२०२५/ए-९६४०८७/एमजेपीजेएवायएबी-पीएमजेएवाय १४ ऑक्टोबर २०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचाराच्या दरांमध्ये रक्त तपासणीपासून रोगाचे निदान होईपर्यंत, एक्स रेपासून ऑपरेशनपर्यंत व रुग्ण (अंगीकृत) रुग्णालयात दाखल झाल्यापासून ते डिस्चार्ज होईपर्यंत होणाऱ्या खर्चाचा समावेश आहे.

१४ ऑक्टोबर २०२५च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे हृदय, फुफ्फुस व मूत्रपिंड प्रत्यारोपण तसेच बोन मॅरो प्रत्यारोपण यासह नऊ उपचार व शस्त्रक्रियांसाठी उपचारनिहाय ९.५ लाख ते २२ लाख रुपये मर्यादेपर्यंत पात्र लाभार्थ्यांना विहित पद्धतीने अर्थसहाय्य केले जाणार आहे. विहीत आरोग्य संरक्षणाच्या मर्यादेबाहेरील एकूण नऊ विशेष उपचारांचा खर्च संबंधित रुग्णालयांना राज्य आरोग्य सोसायटीमार्फत राखीव निधीतून देण्याबाबत १४ ऑक्टोबर २०२५च्या शासन निर्णयान्वये तरतूद केली आहे. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अधिनस्त असलेल्या राखीव निधीतून एकूण नऊ अवयव रोपण/प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या विहित खर्चास मान्यता देण्याकरिता प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्याची व त्यादृष्टीने तांत्रिक सुसज्जता करण्याची प्रशासकीय कार्यवाही सध्या सुरू आहे. या शासन निर्णयात कारडियॅक लॅबच्या खर्चाचा समावेश नाही, याबाबत स्वतंत्र कार्यवाही करण्यात येईल.




## अंबरनाथमध्ये भीषण आग

**अंबरनाथ : प्रतिनिधी**

अंबरनाथ एमआयडीसीमधील एका केमिकल कंपनीत सोमवारी (दि. ९) भीषण आग लागली. या घटनेनंतर कामगार सैरावैरा पळू लागले, तर काही कामगार आत अडकल्याची भीती व्यक्त होत आहे.

आग लागल्यानंतर भीषण स्फोट झाला आणि बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले. आगीचा भडका इतका मोठा होता की, दूरपर्यंत आगीचे आणि धुराचे लोट दिसून येत होते. यामध्ये केमिकल कंपनीच्या शेजारी असलेल्या इतर कंपन्यादेखील आगीच्या भक्षस्थानी सापडल्या. ही आग नेमकी कशामुळे लागली तसेच त्यात किती हानी झाली हे अद्याप समजू शकलेले नाही.

# रायगड जि.प.मध्ये भाजपचा अध्यक्ष विराजमान होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचा अध्यक्ष विराजमान होणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर अलिबागमध्ये मेळाव्याची तयारी सुरू झाली आहे.

रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक ७ फेब्रुवारीला पार पडली. ९ फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार भाजपला १५, राष्ट्रवादी काँग्रेस १६, शिवसेना शिंदे गटाला २१, शिवसेना ठाकरे गट पाच आणि काँग्रेसला दोन जागा मिळाल्या. कुठल्याही पक्षाला बहुमत मिळाले नसले तरी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्या. दोन्ही पक्षांनी आपापली स्वतंत्र गटनोंदणीही करून घेतली.

जिल्हा परिषद, अध्यक्ष उपाध्यक्षपदाची निवडणूक १२ मार्च रोजी होणार आहे.

**अलिबाग येथे मेळाव्याची तयारी सुरू**



आपलाच अध्यक्ष होणार असल्याने भाजपने आनंदोत्सवाची तयारीदेखील सुरू केली आहे. निवडीनंतर अलिबाग समुद्रकिनारी असलेल्या मैदानावर भाजप-राष्ट्रवादीचा विजयी मेळावा होणार आहे. (पान २ वर..)

## बेकायदा बाईक टॅक्सी चालवणाऱ्या कंपन्यांचा तात्पुरता परवाना रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

**नवीन ऑटो रिक्षा परवान्यांनाही स्थगिती**

मुंबईसह परिसरात बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या ई-बाईक टॅक्सीसेवेला लगाम घालण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबेर, रॅपिडो या कंपन्यांचे तात्पुरते बाईक टॅक्सी परवाने रद्द करण्यात आल्याची घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी (दि. ९) विधान परिषदेत केली.

दरम्यान, राज्यातील वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत या संदर्भात निर्णय घेतला जाणार असून त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

## वॉरियर्स क्लबच्या प्रशिक्षणार्थींनी घेतली लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमध्ये वॉरियर्स क्लब अंतर्गत शिवकालीन मर्दानी खेळांचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींनी रविवारी (दि.८) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली.

प्रशिक्षक ओमकार रंधवे आणि ऋतुजा रंधवे यांच्या नेतृत्वाखालील वॉरियर्स क्लबच्या बाल प्रशिक्षणार्थींना लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी, भाला चालविणे इत्यादी मराठी मातीतील पारंपरिक मर्दानी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. लोकनेते रामशेठ ठाकूर हे उलवे येथील हनुमान मंदिर परिसरात आले असता त्यांची प्रशिक्षणार्थींना वॉरियर्स क्लबचे अध्यक्ष सागर रंधवे, प्रशिक्षिका ऋतुजा रंधवे यांच्यासह सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

यावेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य अ‍ॅड.योगिता भगत, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, सुहास भगत, मंदिर कमिटीचे विकास सिंह, मनोजकुमार मौर्य, अ‍ॅड. सुनील मौर्य, गौतम कुमार, राजीव रंजन, मनोज चौधरी, राजकुमार सिंग, संजीव ठाकूर आदी उपस्थित होते.



# राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना सरकारची स्थगिती

**मुंबई : प्रतिनिधी**

वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ९ मार्चपासून राज्यभर नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. तथापि, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत,या संदर्भात निर्णय घेतला जाईल, त्यानूसार पुढील निर्णय घेतला जाणार आहे.अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे स्पष्ट करत भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने महाराष्ट्र शासनाला याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे.



मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य सरकारांना प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारांना लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येणार असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेले ऑटो रिक्षा परवाने अनेक ठिकाणी एकाच घरात देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांगलादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी आमच्या कडे प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत राज्यभरात सरसकट १४ लाखांपर्यंत ऑटो रिक्षा परवाने दिलेले आहेत.

**बेकायदेशीर बाईक टॅक्सी कंपन्यांना दणका**

मुंबई व आसपासच्या भागात वाढत असलेल्या बेकायदा बाईक टॅक्सीसेवेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कठोर कारवाईचा इशारा दिला असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तसेच संबंधित कंपन्यांचे तात्पुरते परवाने रद्द करण्यात आल्याची घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत बोलताना केली.

# निराधारांच्या योजनांचे अनेक प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित

## आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील निराधार नागरिकांसाठीच्या योजनांचे अनेक प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित असल्याचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला आणि या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले.

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, विधवा-परित्यक्ता योजना तसेच दिव्यांग योजना यामधील लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यासाठी तालुकास्तरावर समित्या गठित करण्यात येतात, मात्र गडचिरोली, नागपूर, सोलापूर तसेच रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अशासकीय समित्या गठीत नसल्याने डिसेंबर २०२५पर्यंत अनेक निराधारांचे प्रस्ताव मान्यतेविना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्याची बाब आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून अधोरेखित केली.

शासननियुक्त राजकीय व सामाजिक सदस्य समितीवर नसल्याने मंजूर प्रकरणांचे प्रमाण ९० टक्क्यांवरून ५० ते ६० टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. त्यामुळे अपंग, विधवा व वृद्ध लाभार्थ्यांना लाभापासून वंचित राहावे लागत असून योजनेचा लाभ मिळाला नसल्याने लाभार्थ्यांची आर्थिक




अडचण निर्माण झाली आहे. या प्रकरणी शासनाने चौकशीच्या अनुषंगाने समिती गठित करून लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदारद्वयीने दाखल केला होता.

यावर राज्याचे विशेष सहाय्यमंत्री नरहरी झिरवाळ यांनी लेखी उत्तरात सांगितले की, २० ऑगस्ट २०१९च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता तालुकास्तरावर संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठित करण्यात येते. या समितीवरील अध्यक्ष तसेच अशासकीय सदस्यांच्या नेमणुका संबंधित जिल्ह्यातील पालकमंत्री यांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येतात. गडचिरोली व सोलापूर या जिल्ह्यातील काही तालुक्यात/ नागरी क्षेत्रात संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठित नसल्याने संबंधित जिल्ह्यातील पालकमंत्री यांच्या शिफारसीनुसार समिती गठित करण्याची कार्यवाही सुरू आहे. २० ऑगस्ट २०१९च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१, नमुना-२मधील मुद्दा क्रमांक ४नुसार ज्या जिल्ह्यात अशासकीय समिती गठित नसेल अशा जिल्ह्यात संबंधित जिल्हाधिकारी हे तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती स्थापन करतात. संबंधित तालुक्यातील तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यास पालकमंत्री नसल्याने २० ऑगस्ट २०१९च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये संबंधित तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय समितीमार्फत दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. शासनाच्या १३ मे २०२५ व १३ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणिकृत लाभार्थ्यांना दरमहा डीबीटी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. जानेवारी २०२६अखेर ४७,८८,५४१ इतक्या लाभार्थ्यांना डीबीटी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे,

# पेणमधील बुर्डी गावाजवळ कारने पादचाऱ्यांना उडविले; दोघांचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील बुर्डी गावच्या हद्दीत भरधाव ब्रीझा कारने दोन पादचाऱ्यांना धडक दिल्याने या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

या बाबत ताहिती अशी कि, गुरुवारी ६ मार्च रोजी सायंकाळी ७:३० च्या सुमारास ब्रिझा कार क्रमांक एमएच ०६ बी.यु ४६६४ वरील चालक कार अतिवेगाने चालवित घेऊन जात असताना प्रदीप कुमार साहब सिंग ( वय ३३) व अजय कुमार रामप्रकाश (वय ३१) सध्या रा. एल अँन्ड टी कॉलनी सालिंदे, ता. पेण, मूळ रा. फिरोजाबाद, उत्तरप्रदेश बुर्डी गावाजवळ रास्ता ओलांडत असताना त्यांना कारने जोरदार धडक दिली. दोन्ही तरुणांच्या डोक्याला व हातापायांना गंभीर दुखापती झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातानंतर दोघांना पेण येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते. तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. या अपघाताची खबर न देता वाहनचालक पळून गेला. या प्रकरणी सुनील शन्कर पाटील ( पोलीस पाटील सालिंदे ) यांनी वडखळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

वडखळ पोलिसांनी तपास सुरू करून अवघ्या काही तासात चालकाला ताब्यात घेतले याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सोनावळे करीत आहेत.

## मध्य रेल्वे मुख्य व्यवस्थापकपदाची सूत्रे प्रभात कुमार यांनी स्वीकारली

**रोहे : प्रतिनिधी**

प्रभात कुमार यांनी मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते पूर्व मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक होते.



भारतीय रेल्वे ट्रॅफिक सर्विस (IRTS) १९९३ च्या बॅचचे अधिकारी असलेल्या श्री प्रभात कुमार यांना भारतीय रेल्वेमध्ये परिचालन, वाणिज्य, संरक्षा आणि सतर्कता या क्षेत्रात काम करण्याचा मोठा आणि समृद्ध अनुभव आहे.

प्रभात कुमार यांनी मध्य रेल्वेच्या प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारल्यामुळे त्यांच्या व्यापक कौशल्यामुळे मध्य रेल्वेला विविध आव्हानात्मक कामे आणि उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण करताना त्याचा फयदा होउन आणखी मोठे टप्पे गाठण्यास मदत होणार आहे.

# महाडमध्ये साहित्याचा जागर : रायगड जिल्हा ग्रंथोत्सव २०२६चे आयोजन

**अलिबाग: रामप्रहर वृत्त**

ग्रंथसंस्कृतीचा वारसा जपणे आणि वाचन चळवळ तळागाळापर्यंत पोहोचवणे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्या वतीने 'ग्रंथोत्सव २०२६' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड येथे गुरुवार, दि.१२ आणि शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ रोजी हा ज्ञानोत्सव रंगणार आहे.

गुरुवार दि. १२ मार्च रोजी सकाळी ९:३० वाजता भव्य ग्रंथदिंडी निघणार आहे. महाडचे नगराध्यक्ष सुनिल कविस्कर, उपविभागीय अधिकारी पोपटराव ओमासे आणि उपनगराध्यक्ष संदिप जाधव यांच्या शुभहस्ते या दिंडीचे उद्घाटन होईल. यावेळी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहायक ग्रंथालय संचालक प्रशांत व. पाटील, पोलीस उपअधीक्षक शंकरराव भा. काळे, श्रीमती शोभाताई सावंत, श्रीमती सीमाताई मपारा, गंगाधर साळवी आणि प्रकाश जमदाडे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असेल.

सकाळी ११:०० वाजता मुख्य उद्घाटन समारंभ संपन्न होईल. या सोहळ्याला राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु. अदिती तटकरे आणि मंत्री भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील खासदार सुनील तटकरे, श्रीरंग बारणे, धैर्यशील पाटील आणि आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, रवींद्र पाटील, महेंद्र थोरवे, महेश बालदी, महेंद्र दळवी, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे व विक्रांत पाटील उपस्थित राहतील. प्रशासकीय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी श्री. किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले आणि पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांचीही उपस्थिती असेल.

या दोन दिवसात ग्रंथांचे भव्य प्रदर्शन व विक्री कार्यक्रमस्थळी होणार असून येथे सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. या कार्यक्रमाचे नियोजन सहायक ग्रंथालय संचालक प्रशांत व. पाटील आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित ब. पवार यांनी केले असून या ग्रंथोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रायगड ग्रंथोत्सव समितीने केले आहे.

## खारपाडा येथे महिलेचे तोंड बांधून दरोडा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारपाडा परिसरात घरात घुसून दोन अज्ञात इसमांनी महिलेला साडीने तोंड बांधून मारहाण करत रोख रक्कम व सोन्याच्या दागिन्यांची जबरी चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ७ मार्च रोजी सकाळी सुमारे ९: १५ वाजण्याच्या सुमारास खारपाडा येथील मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या राहत्या घरात ही घटना घडली. दोन अज्ञात इसमांनी घरात जबरदस्तीने प्रवेश करून फिर्यादी महिला घरात एकट्याच असल्याचा फायदा घेत आरोपींनी तिचे तोंड साडीने बांधून त्यांना घाबरवले. यानंतर आरोपींनी घरातील कपाटे व साहित्याची झडती घेत रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण सुमारे १ लाख १२ हजार ४०० रुपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्याचा अधिक तपास पेण पोलीस करीत आहेत.

## नगराध्यक्ष वनश्री शेडगेंची धावीर देवस्थान ट्रस्टवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर रोहा शहरासाठी अभिमानास्पद अशी घटना घडली आहे. रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा कू.वनश्री शेडगे यांची धावीर देवस्थान विश्वस्त समितीवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. देवस्थानच्या इतिहासात प्रथमच एखाद्या महिलेला हा मान मिळाल्याने संपूर्ण रोहेकरांमध्ये आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



नगराध्यक्षा म्हणून काम करत असताना वनश्री शेडगे यांनी शहराच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहेत. सामाजिक व धार्मिक क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची धावीर देवस्थान ट्रस्टवर पदसिद्ध सदस्य पदी निवड करण्यात आल्याचे मानले जात आहे.

या मंगलप्रसंगी आपल्या कुटुंबाची सामाजिक बांधिलकी परंपरा जपत वनश्री शेडगे यांनी देवस्थानसाठी १ लाख रुपयांचा देणगी धनादेश ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, विश्वस्त मकरंद बारटक्के, नितीन परब, काशिनाथ धाटावकर, बापू जोशी, समीर साळवी यांचे उपस्थितीत सुपूर्द केला . त्यांच्या या योगदानामुळे देवस्थानच्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## रायगडातील तापमानात वाढ



**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात उन्हाचा कडाका आता असह्य होऊ लागला आहे. रायगड जिल्ह्याच्या तापमानातही वाढ झाली आहे. अलिबागमध्ये सोमवारी (दि. ९) कमाल तापमान ३२.८ अंश नोंदविले गेले, तर जिल्ह्याच्या इतर भागात तापमान ३५ अंशापेक्षा जास्त होते. याचा जनजीवनावर परिणाम होऊ लागला आहे.

जिल्ह्यातील हवामानात गेल्या काही वर्षांपासून बदल होऊ लागला आहे. तापमान वाढू लागले आहे. पूर्वी जिल्ह्याचे कमाल तापमान हे २९ ते ३० अंशापर्यंत असायचे. आता मे महिन्यात जिल्ह्याच्या काही भागात तापमान ३८ अंशापर्यंत जाऊ लागले आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेस शुकशुकाट दिसून येतो.

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात थंडी होती. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून मात्र तापमानात बदल होऊ लागला. दिवसभर उन्हाचा तडाखा, तर सायंकाळी गारवा अशी परिस्थिती निर्माण झाली. होळी सणानंतर उन्हाचा तडाखा आणखी वाढला आहे. सकाळी १०-११ वाजल्यापासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागते. त्यामुळे रायगडकर उकाड्याने त्रस्त झाले आहेत.

यंदा आंब्याचे पीक चांगले आले. भरपूर मोहर येऊन फळधारणा झाली होती, पण तापमानात अचानक वाढ झाल्यामुळे फळगळती होऊन आंबा बागायतदारांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे उन्हाच्या तीव्रतेमुळे जिल्ह्याच्या काही भागात पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ लागली आहे.

## सिडकोमध्ये महिला दिन उत्साहात साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळामध्ये २०२६ या वर्षीचा महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मार्च २०२६ अखेरीस निवृत्त होणाऱ्या महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको हे विशेष अतिथी म्हणून तर स्मिता शिरोडकर, अतिरिक्त मुख्य नियोजनकार, सिडको या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.तसेच सुभाष पाटील, अध्यक्ष, सिडको एम्प्लॉईज युनियन, नितीन कांबळे, सरचिटणीस, सिडको एम्प्लॉईज युनियन, डॉ. मनिष सोनटक्के, कन्सल्टंट, ऑर्थोपेडिक व स्पाइन सर्जन, कोकीलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई, डॉ. प्रतिक्षा कदम, चिफ डाएटिशियन, कोकीलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई* यांसह सिडकोतील महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रसंगी बोलताना सुरेश मेंगडे यांनी वेगवेगळ्या काळांतील कर्तृत्ववान स्त्रियांचे दाखले देऊन, स्त्रिया सक्षम झाल्याने संपूर्ण समाजाची प्रगती होते असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अखेरीस डॉ. मनिष सोनटक्के आणि डॉ. प्रतिक्षा कदम यांनी उपस्थित महिला कर्मचाऱ्यांस आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

पान १ वरुन

## रायगड जि.प.मध्ये भाजपचा अध्यक्ष विराजमान होणार

या मेळाव्याची सध्या जय्यत तयारी सुरू असून त्यासाठी भव्य मंडप उभारला जात आहे. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जाते.

**येत्या १२ तारखेला होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत रायगड जिल्हा परिषदेत भाजप-राष्ट्रवादीची सत्ता येईल आणि पहिल्यांदाच भाजपचा अध्यक्ष होणार आहे. ही आमच्यासाठी मोठी आनंदाची बाब आहे. हा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी आम्ही भाजप-राष्ट्रवादीचा मेळावा त्याच दिवशी आयोजित केला आहे. त्याची तयारी सुरू आहे.**

**-ॲड. महेश मोहिते,** सरचिटणीस भाजप, दक्षिण रायगड

## अलिबागेतील जिल्हा रुग्णालयात एचपीव्ही लसीकरणास सुरवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिला आणि मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस म्हणजे एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ राज्यस्तरावर रविवारी महिला दिनाचे औचित्य साधून करण्यात आला. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयातही एचपीव्ही लसीकरण करण्यास सोमवारी (दि.९) सुरुवात करण्यात आली.

आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व पात्र मुलींना ही लस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी किशन जावळे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी एचपीव्ही लसीकरण मोहिमेची तयारी, नियोजन, विविध विभागामधील समन्वय, लसीकरण सत्रांचे नियोजन, मानव संसाधन उपलब्धता, कोल्ड चेन व्यवस्था तसेच जनजागृती मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

लसीकरणानंतर ३० मिनिटे आरोग्य केंद्रावर थांबणे आवश्यक आहे. काही वेळा हलका ताप किंवा इंजेक्शन दिलेल्या जागी थोडे दुखणे यासारखे किरकोळ लक्षणे दिसू शकतात. जी २-३ दिवसात बरी होतात.रायगड जिल्ह्यातील सर्व पालक आणि नागरिकांनी आपल्या १४ ते १५ वयोगटातील सर्व मुलींना गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळवावे आणि या महत्त्वपूर्ण सार्वजनिक आरोग्य मोहिमेला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे.

**पोर्टल वर व प्रत्यक्षात करता येईल नोंदणी**

ज्या मुलींनी वयाची १४ वर्षे पूर्ण केली आहेत (१४ ते १५. वयोगटातील मुली) अशा सर्व मुलींना हे लसीकरण करण्यात येणार आहे. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत ओपीडीच्या वेळेत हे लसीकरण सुरू आहे. या मोहिमे अंतर्गत क्वार्डीवॅलेट एचपीव्ही लस दिली जाणार असून, या वयोगटातील मुलींसाठी लसीचा फक्त एकच डोस संरक्षणासाठी पुरेसा आहे. पालकांना ' यू - विन ' पोर्टलवर स्वतः हून नोंदणी करता येईल किंवा लसीकरण केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन नोंदणीची सोय उपलब्ध आहे.

## निवडक

### खारघरमध्ये मैदानात आग

**पनवेल :** खारघर सेक्टर ३५ पॅराडाईज सोसायटी आणि तळोजा सेक्टर १६ आस्था पॅलेस सोसायटीलगत असलेल्या मोकळ्या मैदानातील वाळलेल्या गवताला अचानक आग लागल्याची दुर्घटना घडली आहे. खारघर अग्निशमन जवानांनी धाव घेत ही आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला. खारघर सेक्टर ३५ पॅराडाईज सोसायटीलगत असलेल्या मैदानातील गवताला तर तळोजा फेज -२ आस्था पॅलेस सोसायटीलगत मैदानात साचलेल्या कोरड्या गवताला आग लागली. या दुर्घटनांची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

### पनवेलमध्ये तरुणाची आत्महत्या

**पनवेल :** २८ वर्षीय तरुणाने राहत असलेल्या घराच्या हॉलमधील सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अतुल वाघेला असे या तरुणाचे नाव असून, या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. अतुल वाघेला याने नेमकी कोणत्या कारणावरून आत्महत्या केली याचे हे समजू शकले नसून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# महामार्गावरील वाहनांतून डिझेल चोरीचे वाढते प्रकार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये महामार्गावर उभ्या असणाऱ्या वाहनांतून डिझेल चोरीचे अनेक प्रकार घडत असल्याने पोलीस डिझेल चोरांना पकडण्यात अपयशी ठरत असल्याने स्वता वाहनचालक व मालकांनी कायदा हातात घेऊन स्वता मारहाणीचे पाऊल उचलण्याच्या घटना घडत आहेत.

तळोजा येथे अशाच एका घटनेत एका निष्पाप फळविक्रेत्याला बेदम मारहाण झाली. ही घटना पहाटे सहा वाजता मुंब्रा-पनवेल महामार्गावर घडली. मुंब्रा-पनवेल महामार्गावरील तळोजा गावालगत नौमानी मशीदीजवळ मोठ्या प्रमाणात जड व अवजड वाहने उभी केली जातात. याच ठिकाणी कलिंगड खरेदीसाठी किरकोळ व्यापारी घाऊक व्यापाऱ्यांकडे पहाटेच येतात. ३४ वर्षीय बिलाल अब्दुल रौफ नम्रे हे सुद्धा तेथे कलिंगड खरेदीसाठी आले होते, मात्र या ठिकाणी ट्रकचालक निरज यादव आणि त्याचा वाहनावरील मदतनीस मोहम्मद इजराईल हमीद हसन याने बिलाल यांच्या अंगावरील कपडे मळके असल्याने त्याला डिझेल



चोर समजून त्याला हाताने मारहाण सुरू केली. त्यानंतर बिलाल याला या ट्रकमध्ये कोंडून कळंबोली येथील स्टील मार्केटमधील डिस्मा वजनकाटा या इमारतीजवळील एका झाडाला बांधून पुन्हा हाताबुक्याने व सळईने मारहाण केल्याचे बिलाल यांनी तळोजा पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची बातमी तळोजा पोलिसांना समजताच तातडीने काही मिनिटात पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार मोहिते यांच्यासर पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन जखमी बिलाल याची ट्रकचालक यादव व त्याच्या साथीदाराच्या हातून सुटका केली. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी बीएनएस २०२३ चे कलम ११८(१), १३७(२) प्रमाणे ट्रकचालक निरज यादव आणि त्याचा मदतनीस मोहम्मद इजराईल हमीद हसन यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मोहिते करीत आहेत.

विशेष म्हणजे महामार्गावरील डिझेल चोरीप्रमाणे नवी मुंबईत पायी चालणाऱ्या महिलांच्या गळ्यातून मंगळसूत्र आणि सोनसाखळी चोरीच्या अनेक घटना घडत आहेत. अनेक घटनांमध्ये महिला गंभीर जखमी होत आहेत. यापूर्वी ज्येष्ठ नागरिकांना पोलीस असल्याच्या भितीने अशाच गुन्हेगारांनी लुटले आहे.

## पेट्रोल पंपातून कॉपर वायरची चोरी

### आरोपी पनवेल तालुका पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंप मध्ये असलेल्या एक लाख रुपये किमतीच्या कॉपर वायरची चोरी करणाऱ्या त्रिकुटाला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून काही प्रमाणात चोरीला गेलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी हस्तगत करण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यातील सोमाटणे गावाच्या हद्दीत नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंप मध्ये बसवण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मर मधून अज्ञात चोरट्यांनी सुमरे एक लाख रुपये किमतीच्या कॉपर वायरची चोरी केल्याची घटना घडली होती. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गिजे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत,



पोहवा धुमाळ, देवरे, कुदळे, बाबर, तांडेल, महारसे, भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने आरोपी अनिल यादव (वय २५), अवधेश मोर्या (वय १९) आणि विष्णु चौरासिया (वय ४४) तिघेही राहणार नेरेपाडा यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले.

पोलिसांनी त्यांच्याकडून काही प्रमाणात चोरीला गेलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी हस्तगत केली आहे.

## बनावट चेक आणि सहीद्वारे रकमेवर डल्ला

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात भामट्याने पनवेल येथील कर्मचारी राज्य विमा निगम (ईएसआयसी)च्या शाखेतील कार्यालयाचा बनावट धनादेश तयार करून त्याद्वारे ९६,९०० रुपये स्वतः च्या खात्यात वळवून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या भामट्याने ईएसआयसीच्या शाखा व्यवस्थापकाची बनावट सही करून ही फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

गुन्हे

पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात भामट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. संकेत शिंदे (वय ३८) हे पनवेल येथील कर्मचारी राज्य विमा निगम कार्यालयात शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २९ जानेवारी रोजी कार्यालयाचे कॅशियर सत्येंद्र कुमार पंडित हे बँकेचे स्टेटमेंट तपासत असताना, त्यांना खात्यातील शिल्लक रकमेत तफावत असल्याचे दिसून आले. त्यावर त्यांनी अधिक तपास केला असता, २८ जानेवारी रोजी एका चेकद्वारे ९६,९०० रुपये दुसऱ्या खात्यात वळवण्यात आल्याचे आढळले. धक्कादायक बाब म्हणजे, ज्या चेकद्वारे पैसे काढले गेले, तो चेक मूळ चेकबुकमध्ये तसाच कोरा असल्याचे आढळून आले. तसेच बनावट चेकवर अज्ञाताने शाखा व्यवस्थापकांची बनावट स्वाक्षरी करून त्याद्वारे ९६,९०० रुपयांची रक्कम उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील ॲक्सिस बँकेच्या सुशीला नामक खातेदाराच्या खात्यात वळवण्यात आल्याचे तपासात आढळले.

दरम्यान, अज्ञात व्यक्तीने आणखी दोन बनावट चेकद्वारे काही रक्कम दुसऱ्या खात्यात वळवण्याचे प्रयत्न केले, मात्र ते चेक वटले नाहीत. परंतु या प्रक्रियेत बँकेने तांत्रिक कारणास्तव ईएसआयसीच्या खात्यातून दोनदा १७७ रुपये दंड म्हणून कापून घेतले आहेत. आपल्या नावाचा आणि पदाचा गैरवापर करून सरकारी निधीची चोरी झाल्याचे लक्षात येताच व्यवस्थापक संकेत शिंदे यांनी पनवेल शहर पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## एमएनएम विद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात जागतिक महिला दिन महिला सबलीकरण आणि सक्षमीकरण, तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव, याचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी सर्व महिला शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन कार्यक्रमात स्वागत केले. शाळेतील शिक्षकांनी महिला शिक्षकांसाठी विविध मनोरंजनात्मक, गमतीदार तसेच बुद्धिवर्धक, खेळांचे आयोजन केले. शिक्षकांनी या सर्व खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मनमुराद आनंद घेतला.

पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी विविध गमतीदार खेळांमध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व महिला शिक्षिकांचे करत सर्वांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन परेश पावसकर, अविनाश कजबजे यांनी केले. तसेच कार्यक्रमासाठी संतोष पवार, भास्कर म्हात्रे, राहुल म्हात्रे, सिद्धार्थ लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महापौर नितीन पाटील यांचा समाजाभिमुख निर्णय

**पनवेल : वार्ताहर**

समाजहित आणि नागरिकांच्या आरोग्याप्रती आपली कटिबद्धता जपत पनवेल महापालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांनी एक अत्यंत आदर्शवत आणि महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. महापौरपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आपल्याला मिळणारे सर्व प्रकारचे मानधन आणि भत्ते महापौर सहाय्यता निधीमध्ये जमा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून



## मानधन आणि भत्ते महापौर सहाय्यता निधीत करणार जमा

या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत आणि कौतुक होत आहे.

महापौर नितीन पाटील यांनी नगरसचिवांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, नुकतीच पनवेल महापालिकेच्या महापौरपदी माझी निवड झालेली असून महापालिका अधिनियमान्वये माझ्या नावाने अनुज्ञेय असलेले प्रतिमाह मानधन, बैठक भत्ता, स्वीय्य सहायकाचे मानधन व वाहनभत्ता यांची सर्व रक्कम महापौर सहाय्यता निधीमध्ये जमा करण्याचा माझा निर्णय आहे. हा निर्णय मी समाजहित व नागरिकांना त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांमधून दिलासा मिळावा या उद्देशाने घेतलेला आहे.

दरम्यान, अशा प्रकारे स्वतः च्या हक्काच्या मानधनाचा त्याग करून तो निधी समाजकार्यासाठी खर्च करण्याचा हा पायंडा स्तुत्य असल्याची भावना व्यक्त होत आहे. अनेकांनी या निर्णयाचे स्वागत करून त्यांचे कौतुक केले आहे.

## पनवेल लाईन आळीत शिवशक्ती मित्र मंडळातर्फे विविध कार्यक्रम

### महापौर नितीन पाटील यांचा सत्कार



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांचा शिवशक्ती मित्र मंडळाच्या वतीने रविवारी एका विशेष समारंभात जाहीर सत्कार करण्यात आला.

लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळाच्या वतीने आयोजित वार्षिक उत्सवाच्या सांगता समारंभात महापौर मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना नितीन पाटील यांनी लाईन आळीच्या सांस्कृतिक वारशाची तुलना थेट मुंबईशी केली. ज्याप्रमाणे मुंबईत लालबाग-परळमध्ये सणांचा मोठा उत्साह असतो, तसाच उत्साह पनवेलच्या लाईन आळीत पाहायला मिळतो. खऱ्या अर्थाने लाईन आळी म्हणजे पनवेलचे लालबाग-परळ आहे. शिवशक्ती मित्र मंडळ हे केवळ एक मंडळ नसून आपली संस्कृती आणि परंपरा जपणारे एक कुटुंब आहे, अशा शब्दांत त्यांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

या सोहळ्याला नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका नीता माळी, नीता नरसाळे, भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, रूपेश नागवेकर, उज्वला गावडे, पत्रकार संजय कदम, विशाल सावंत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. श्री सत्यनारायण महापूजा आणि त्यानंतर आयोजित महाप्रसादाने या उत्सवाची उत्साहात सांगता झाली.



**कामोठे :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ६ आणि १४ या केंद्रांवर एचपीव्ही लसीकरण मोहिमेचे उद्घाटन नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभवी निंबाळकर, डॉ. संकेत पवार, हरविंदर सिंग आणि दोन्ही नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते.



**पनवेल :** कोळीवाडा येथील येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांवर एचपीव्ही लसीकरण मोहिमेचे उद्घाटन नगरसेविक दर्शना भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.नेहा म्हात्रे, डॉ.निखिल गवते, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी कविता पाटील आदी उपस्थित होते. हे लसीकरण मोफत ९० दिवस राहणार असून मुलींनी लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेविका भोईर यांनी केले आहे.

## रायगड जिल्ह्यात प्रथमच मेगा किडनी हेल्थ कॅम्प

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक किडनी दिनानिमित्त रायगड जिल्ह्यात प्रथमच मेगा किडनी हेल्थ कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने येत्या मंगळवारी १२ मार्च २०२६ रोजी उलवेतील मेडिकव्हर क्लिनिक, उरण येथील पालवी हॉस्पिटल (करंजा रोड), कर्जतमधील रतनराज क्लिनिक, रसयानीचे पल्स हॉस्पिटल व निरामय हॉस्पिटल तर खोपोलीतील डॉ. साबणे यांचे मनस्वी हॉस्पिटल व जखोटिया नर्सिंग होम येथे या शिबिराचा लाभ घेता येणार आहे.

इच्छुक नागरिकांनी ८६५५४७८५३५ या संपर्क साधून नाव नोंदणी करावी असे आवाहन रुग्णालयाच्या वतीने करण्यात आले.या शिबिरामध्ये किडनीच्या आरोग्याची तपासणी, सिरम क्रिएटिनिन आणि युरीन रूटीन तपासण्या करण्यात येणार असून, तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्लाही घेता येणार आहे. या तपासणीसाठी असलेल्या पॅकेजची किंमत केवळ १०० रुपये ठेवण्यात आली असून सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात या तपासण्या करुन घेता येतील.

मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, किडनी स्टोन, कुटुंबात किडनी आजाराचा इतिहास असलेले रुग्ण तसेच ४० वर्षांवरील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. आवश्यक असल्यास किडनी अल्ट्रासाऊंड (KUB)देखील सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## सीकेटी महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी)आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या वतीने सोमवारी (दि.९) जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

याकार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी केले. यावेळी त्यांनी महिला हक्क चळवळीची पार्श्वभूमी सांगून जागतिक महिला दिनाचा उदय व त्याचे महत्व सांगितले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.



पाटील, आय.क्यू.ए.सी.समन्वयक प्रो. डॉ.बी.डी.आघाव, कला शाखा प्रमुख प्रो.डॉ. बी. एस. पाटील, विज्ञानशाखा प्रमुख डॉ. जी.एस. ठाकूर, प्रो. डॉ. बी. व्ही. जाधव, डॉ. एस. एन. वाजेकर आणि डॉ. एस. एन. परकाळेयांनीउपस्थिती लावली. या कार्यक्रमात ७८ प्राध्यापिका व शिक्षकेत्तर महिलांनी सहभाग घेतला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचेगुलाबपुष्पदेऊन स्वागत केले, तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीतील महिला वर्गाचेयोगदान अधोरेखित करूनत्यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच यावेळी प्रा. नीलिमातिदार यांनी एनसीसीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठीत्यांचाही पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.स्मिता भोईर, प्रा. भावेश भोईर आणि प्रा. क्रांती जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन महिला विकास कक्षाच्या सदस्या प्रा. सोनाली हुद्दारयांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवश्री गाडगीळ यांनी केले.

## शेतात घातक कचऱ्याची विल्हेवाट; दोघांवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथील धानसर गावच्या शेतात घातक रासायनिक कचरा टाकून पर्यावरण व लोकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या दोन व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तक्रारीनंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

धानसर गावाबाहेरील एका मोकळ्या शेतात पहाटेच्या वेळी काही व्यक्तींनी जमिनीत खड्डा खोदून उघड्यावर घातक रसायने टाकली होती. जीवसृष्टीला धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याची तक्रार स्थानिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली. त्यानुसार ४१ ड्रम घन रसायने, ३६ ड्रम द्रव रसायने, ३६ रिकामे ड्रम आणि सुमारे ४० ते ५० पांढऱ्या गोणींमध्ये भरलेला घनकचरा हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी मोहम्मद अली असगर अली खान (वय ५०) आणि अफसर रहिस अहमद खान (वय ३९) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## संपादकीय

# स्वागतार्ह सत्तापालट

अवघे जग इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यात पेटलेल्या विध्वंसक संघर्षाने धास्तावलेले असताना नेपाळसारखा एक छोटासा देश अंतर्गत अस्थिरतेचा कालखंड मागे टाकून निवडणुकीच्या मार्गाने नवे लोकनियुक्त सरकार स्थापण्यात गुंतलेला होता. नुकत्याच नेपाळमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बलेंद्र (बलेन) शाह या ३५ वर्षांच्या नेत्याला तेथील जनतेने भरभरून कौल देऊन पंतप्रधानपदी बसवले आहे.

**गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात नेपाळमधील 'जेन झी'च्या आंदोलनाने जगभराचे लक्ष वेधून घेतले होते. भ्रष्टाचार व बेरोजगारीमुळे तेथील तरुणांमध्ये असंतोष होता. त्यात समाजमाध्यमांवर आणलेल्या बंदीमुळे सरकारविरोधाचा उद्रेक झाला. या असंतोषाचा रेटा इतका तीव्र होता की तत्कालीन पंतप्रधान ओली यांचे सरकार त्यासमोर टिकाव धरू शकले नाही. जेन झीच्या या आंदोलनाचा चेहरा बलेन शाह होते. यापूर्वी नेपाळमध्ये सार्वत्रिक निवडणुकांमध्ये नेपाळी काँग्रेस आणि तेथील दोन कम्युनिस्ट पक्ष याच तीन पक्षांमध्ये लढत होऊन तेच आलटून-पालटून सत्ता काबीज करत. पण तरुणांच्या आंदोलनानंतरच्या पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत तेथील जनतेने प्रस्थापित पक्षांना नाकारून तुलनेने खूपच नवा पक्ष आणि तरुण पंतप्रधानांची निवड केली आहे. तरुण नवमतदारांनी हा सत्तापालट घडवून आणला आहे हे विशेष. कायम भारतविरोधी व चीनधार्जिणी भूमिका घेणारे माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांचा या निवडणुकीत पराभव झाला असून बलेंद्र (बलेन) शाह या ३५ वर्षांच्या नेत्याला नेपाळच्या जनतेने भरभरून कौल देऊन पंतप्रधानपदी बसवले आहे. शुक्रवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बलेंद्र शाह यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीला (आरएसपी) निर्णायक बहुमत मिळाले. हा पक्ष अवघ्या चार वर्षांपूर्वी स्थापन झालेला असून या पक्षाने बलेन शाह यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार घोषित करून निवडणूक लढवली. माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचा शाह यांनी या निवडणुकीत पराभव केला. ओली यांनी यापूर्वी चार वेळा पंतप्रधानपद भूषवले होते. कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपालचे ते अध्यक्षही आहेत. बलेन शाह हे रॅपगायक असल्याचा गवगवा झाला असला तरी ते अभियंताही आहेत. अभियांत्रिकी शिक्षणानंतर बेळगाव येथून त्यांनी एम.टेक.ही केले आहे. राजधानी काठमांडूच्या महापौरपदी २०२२ मध्ये अपक्ष उमेदवार म्हणून त्यांनी दमदार विजय मिळवला होता. नेपाळने भारत किंवा चीन दोहोंच्याही हातचे बाहुले राहू नये अशी त्यांची भूमिका आहे. भारतासाठी नेपाळ सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. त्यामुळेच चीनपासून अंतर राखण्याची बलेन शहा यांची भूमिका भारताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळमधील जनतेचे व नवनिर्वाचित सरकारचे अभिनंदन केले आहे. भारत नेपाळचा शेजारी व मित्र असून शांतता, प्रगती आणि समृद्धीची नवी उंची गाठण्यासाठी आपण नव्या सरकारसोबत सहकार्याने काम करू असे मोदींनी म्हटले आहे. ताज्या सत्तापालटातून नेपाळमध्ये स्थैर्य येईल अशी आशा आहे. स्थिर सरकारमुळे त्या देशाचे भारताशी असलेले संबंध दृढ होऊ शकतील. भारत आणि नेपाळ यांच्यात खुली सीमा असून दोन्ही देशांमध्ये सहज व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाण होते. अनेक क्षेत्रांमध्ये भारत नेपाळला सहकार्य करत असतो. परंतु काही वेळा उभय देशांमध्ये परराष्ट्र धोरणासंबंधी मतभेद किंवा सीमावादही उद्भवला आहे. सत्तेवर आलेल्या नव्या सरकारची भूमिका मैत्रीपूर्ण संबंधांची असेल असे दिसते आहे. त्यामुळे भारताच्या दृष्टीने तेथील सत्तापालट स्वागतार्ह म्हणता येईल.**

# महिला व बालविकास विभागाच्या कल्याणकारी योजना

भारतीय महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरण हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असून, महिला व बालविकास विभागामार्फत मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मनोधैर्य योजना तसेच आदिशक्ती अभियान अशा विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. या योजनांचे अधिक बळकटीकरण करून सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभागामार्फत सातत्याने विविध उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत. भविष्यातही महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि सुरक्षा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक आणि आश्वासह आराखडा तयार करण्यात आला असून, विभागामार्फत त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव आर्थिक तरतूदीची घोषणा केली आहे. राज्यभरातील एकल महिलांचे सर्वे क्षण करून त्यांच्या कल्याणासाठी योग्य आणि प्रभावी धोरण राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ग्रामीण जिवनोन्नती अभियानांतर्गत आतापर्यंत सुमारे ३७ लाख महिला 'लखपती दीदी' बनल्या असून, आणखी २५ लाख लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. याशिवाय महिला बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची आणि स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे महिला स्वयंसहायता गटांना व्यवसायवृद्धीची संधी मिळून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण**

राज्यातील महिलांचे आरोग्य पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे. आत्तापर्यंत दोन कोटी ३७ लाख पेक्षा



जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

**लेक लाडकी योजना**

मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, त्यांचे शिक्षण वाढवणे आणि त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक आधार देणे हा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत पात्र मुलीला जन्मापासून १८ वर्षांपर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण सुमारे १ लाख १ हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते.

शासकीय महिला वसतिगृहे / आधारगृह

१६ ते ६० वर्ष वयापर्यंतच्या निराधार, निराश्रित परित्यक्ता, कुमारीमाता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेलया महिलांना आश्रय संरक्षण व मुलभूत सुविधा परुवून त्यांचे नोकरी, व्यवसाय आणि विवाह याद्वारे पुनर्वसन करण्यात येते. पात्र महिलेस एक हजार, पहिल्या बालकास रूपये ५०० रूपये, दुसऱ्या बालकास ४०० रूपये अनुदान प्रदान करण्यात येते.

**संरक्षणगृह**

अनैतिक व्यापार कायद्याअंतर्गत पोलीसांमार्फत कुंटखान्यातून सोडविलेल्या पिडीतेस संरक्षणगृहात ठेवण्यात येते. राज्यातील २० शासकीय महिला राज्यगृहांना संरक्षण गृहे म्हणून घोषित करण्यात आले.

बालगृहातील निराश्रित मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्यशासकीय व स्वयंसेवी संस्थांची आधारगृहे, महिला वसतीगृहे या संस्थांमधील अनाथ मुलीच्या विवाहासाठी २५ हजार अनुदान दिले जाते. १५ हजार रूपये मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत पाच वर्षाकरिता योजनेत गुंतविण्यात येतात. तसेच १० हजार रकमेची संसारोपयोगी साहित्य संस्थेमार्फत खरेदी करण्यात येतात.

देवदासीकरीता कल्याणकारी योजना (श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना)

४० वर्षावरील प्रमाणीत देवदासीना उदर निर्वाहाकरीता दरमहा ६०० इतके निर्वाह अनुदान देण्यात येतात. देवदासीच्या पदवीधर मुलीच्या विवाहासाठी ५० हजार आणि पदवी नसल्यास २५ हजार अनुदान देण्यात येते. देवदासीच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी वर्षातून एकदा मुलासाठी १६०० तर मुलीसाठी १७५० एवढे दरडोई अनुदान देण्यात येते.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार**

महिला व बालकल्याण क्षेत्रात तसेच आर्थिक, सामाजिक, उन्नतीसाठी, शिक्षण, पुनर्वसन, अंधश्रद्धा निमूर्लन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या महिला व संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येते.

महिला व बालकल्याण समिती जिल्हा परिषद समिती मार्फत महिला व बाल विकासाची विविध कामे करण्यासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान देण्यात येते.

**महिला समुपदेशन केंद्र योजना**

महिलांवर होणाऱ्या अत्याचारास आळा बसावा यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात सुरू करण्यात आली आहे. राज्यात १२६ समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत.शुभमंगल सामुहिक विवाह योजनायोजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या मुलीच्या विवाहासाठी प्रति जोडपे १० हजार एवढे अनुदान वधुच्या कुटूंबियांच्या नावे देण्यात येतात.

**मनोधैर्य योजना**

बलात्कार/पोस्को कायद्याअंतर्गत १८ वर्षाखालील बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना तीन लाख ते रूपये १० लाखापर्यंत अर्थसहाय तसेच विविध सेवा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येते.

**१८१ टोल फ्री महिला हेल्प लाईन**

हेलपलाईन नियंत्रण कक्षामध्ये ज्या जिल्ह्यांची तक्रार असेल, त्या संबंधित जिल्ह्यातील वन स्टॉप सेंटरला ऑनलाईन पद्धतीने सदरील तक्रार पाठविली जाते.

नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह

ज्या महिलांचे मासिक उत्पन्न शहरांत ५० हजार आणि इतर ठिकाणी ३५ हजार पेक्षा जास्त नाही अशा नोकरी करणाऱ्या महिलांना वसतीगृहात प्रवेश देण्यात येतो. ७४ वसतिगृह कार्यरत आहेत. नोकरी करणाऱ्या एकल महिलांसाठी नव्याने ५० वसतीगृहे सुरू करण्यात येणार आहे.

**वन स्टॉप सेंटर**

महिलांबरोबर होणारे शारिरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक समाजाकडून होणारा त्रास, अवहेलना, अशा संकटांसाठी त्या महिलेस व तिच्या कुटुंबियाना न्याय मिळण्यासाठी तथा वैद्यकीय उपचारांसाठी राज्यात ४५ केंद्र कार्यरत आहेत. महिलेस वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीस सहाय, मानसोपचार, विधी सहाय, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इत्यादी सुविधा पुरविण्याची तरतूद करण्यात येते.

**शक्तीसदन**

केंद्र पुरस्कृत शक्ती सदन योजनेअंतर्गत राज्यातील निराधार, निराक्षीत, नैसर्गिक आपत्तीत कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न वस्त्र निवारा व वैद्यकीय मदत कायदेविषयक समुपदेशन व हेल्पलाइन द्वारे मार्गदर्शन करण्यात येते तसेच लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या वेश्याव्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन शिक्षण व प्रशिक्षण देऊन पुनर्वसन केले जाते. राज्यात १९ सदन कार्यरत आहेत.महिलाना नोकरीत आरक्षणशासकीय निमशसकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये सेवा भरतीत महिलाना ३० टक्के आरक्षण.

**हुंडा प्रतिबंध अधिनियम**

हुंडा देणे/ घेणे कृतीबाबत पाच वर्षाचा कारावास तसेच दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. हुंडा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने मागविण्यास कमीत कमी ६ महिने ते ५ वर्षापर्यंत कारावास तसेच दंडाची तरतूद आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'शी (ड्क्श) पोर्टल' सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून महिलांना ऑनलाइन पद्धतीने तक्रार नोंदविता येते. तसेच प्रत्येक आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले असून, अशी समिती स्थापन न केल्यास संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

**स्थानिक तक्रार समिती**

३६ जिल्ह्यात स्थानिक तक्रार समिती स्थापन करण्यात आली असून या अंतर्गत प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.तसेच राज्यात ६३,५४२ अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.

**निरीक्षण गृह**


अन्न वस्त्र निवारा वैद्यकीय औपचारिक अनौपचारिक शिक्षण व्यावसायिक प्रशिक्षण समुपदेशन यासाठी विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी निरीक्षण गृह कार्यरत राज्यात १५ शासकीय निरीक्षण गृह व ४१ स्वयंसेवी अशी ५६ निरीक्षणगृह कार्यरत आहेत.

**-श्रद्धा मेश्राम,** विसंअ




## स्मार्टफोन कॅमेरा आणि माईकद्वारे होऊ शकते हेरगिरी

डिजिटल युगात, स्मार्टफोन वापरकर्त्यांना गोपनीयतेचे उल्लंघन आणि डेटाचोरीचा धोका असतो. अनेक संशोधनांमधून असे दिसून आले आहे की स्मार्टफोन कॅमेरा, मायक्रोफोन आणि सर्च हिस्ट्री अशा वेगवेगळ्या मार्गांनी तुमची हेरगिरी करू शकतो.




अनेक स्मार्टफोन वापरकर्त्यांना असे वाटते की जर ते एखाद्या उत्पादनाबद्दल बोलले तर त्यांचा फोन त्याच उत्पादनाच्या जाहिराती दाखवू लागतो.

अशा परिस्थितीत, प्रश्न असा उद्भवतो की तुमचा स्मार्टफोन तुमचे ऐकत आहे की नाही हे कसे शोधायचे? स्मार्टफोनच्या कोणत्या सेटिंग्जद्वारे हेरगिरी रोखता येते? या बातमीत आम्ही तुम्हाला या सेटिंग्जबद्दल सांगत आहोत.

**या सेटिंग्जद्वारे हेरगिरी नियंत्रित करा**

तुमच्या स्मार्टफोनवरील अनेक ॲप्लिकेशन्सना तुमचा कॅमेरा, मायक्रोफोन आणि स्टोरेजमध्ये प्रवेश असतो. याद्वारे कोणताही ॲप तुमचे संभाषण ऐकू शकतो. हे टाळण्यासाठी, तुम्हाला तुमचा प्रवेश मर्यादित करावा लागेल किंवा फक्त निवडक परवानग्या द्याव्या लागतील.

**१. ॲप परवानग्या व्यवस्थापित करा**

तुमच्या फोनच्या सेटिंग्जमधील सुरक्षा आणि गोपनीयता पर्यायावर जा. येथे तुम्हाला प्रायव्हसीचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक करून परमिशन मॅनेजर वर जा. येथे सर्व ॲप्लिकेशन्सचा मायक्रोफोन ॲक्सेस दाखवला जाईल. तुमच्या गरजेनुसार ते व्यवस्थापित करा.

**२. सॉफ्टवेअर अपडेट ठेवा**

तुमच्या फोनचे सॉफ्टवेअर आणि ॲप्स अपडेट ठेवा. तुमच्या फोनचा सुरक्षा पॅच दर महिन्याला अपडेट करा.

**३. व्हॉइस असिस्टंट अक्षम करा**

फोनवर सिरी, गुगल असिस्टंट किंवा अलेक्सा सारखे व्हर्च्युअल असिस्टंट बंद करा. यामुळे फोनमध्ये आवाज ऐकणे टाळता येते.

**४. असुरक्षित सार्वजनिक वाय-फाय वापरणे टाळा**

सार्वजनिक वाय-फाय नेटवर्क आणि हॉटस्पॉट्स हॅकिंगचे साधन बनू शकतात. हे टाळण्यासाठी, असुरक्षित सार्वजनिक वाय-फाय वापरताना तज्ञछ वापरा.

**५. थर्ड पार्टी ॲप्सचे निरीक्षण करा**


अज्ञात थर्ड पार्टी ॲप्स डाउनलोड करणे टाळा. फक्त अधिकृत ॲप स्टोअरमधून ॲप्स इन्स्टॉल करा. इंस्टॉलेशननंतर, ॲप्सना फक्त आवश्यक परवानग्या द्या.

# कवी मंगेश पाडगावकर

कवी मंगेश पाडगावकर यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी वेंगुर्ले येथे झाला. मराठी आणि संस्कृत विषय घेऊन एमए झालेल्या पाडगावकर यांनी दोन वर्षे महाविद्यालयात अध्यापक म्हणूनही काम केले. १९५३ ते १९५५ ही दोन वर्षे पाडगावकर यांनी 'साधना' साप्ताहिकात सहसंपादक म्हणून काम केले. मुंबई आकाशवाणीवर १९६४ ते १९७० या कालावधीत निर्माता म्हणूनही त्यांनी काम केले. युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिस-युसीस येथे मराठी विभागाचे प्रमुख संपादक म्हणून काही वर्षे काम केल्यानंतर १९८९मध्ये ते निवृत्त झाले.

६० आणि ७०च्या दशकात पाडगावकर, 'ज्ञानपीठ' विजेते कवी विंदा करंदीकर आणि कवी वसंत बापट यांचे एकत्रित काव्यवाचनाचे कार्यक्रम राज्यात अनेक ठिकाणी झाले. पाडगावकर यांनी लिहिलेली 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'शुक्रतारा मंद वारा' ही गाणीही खूप गाजली. प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं अगदी सेम असतं ही त्यांची कविताही विशेष गाजली होती.

दुबईमध्ये झालेल्या दुसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे पाडगावकर अध्यक्ष होते. उतारवयातही त्यांनी अनेक कार्यक्रमांमधून



## निमित्त

आपल्या कविता सादर करून रसिकांचे मन जिंकले. २०१३मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २००८मध्ये त्यांना राज्यातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९८०मध्ये त्यांच्या सलाम या कविता संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. 'धारानृत्य' हा पाडगावकर यांचा पहिला काव्यसंग्रह 'जिप्सी','छोरी','उत्सव', 'विदुषक','सलाम','गझल','भटके पक्षी', 'बोलगाणी' हे पाडगावकर यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. पाडगावकर यांनी 'गझल', 'विदुषक', 'सलाम' या काव्यसंग्रहातून राजकीय आशयाची व उपरोधिकपणा असलेली समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता केली. सत्तेच्या संपर्कात राहणार्या वर्गातील लोकांनी सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील माणसांचा केलेला मानभंग, मध्यमवर्गीयांमध्ये आलेली लाचारी, दांभिकता याबद्दल पाडगावकर यांच्या मनात संताप होता तो या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त झाला. १९६०नंतरच्या वास्तवावर भेदकपणे प्रकाश टाकणारी पाडगावकर यांची कविता नवसमृद्ध वर्गाची, त्याच्या संवेदनाहीन मनाची चिरफाड करून वाचकांना अंतर्मुख करते. पाडगावकरांची कविता सादर करण्याची एक विशेष ढब होती. त्या ऐकताना श्रोते जसे खळखळून हसत तसेच मंत्रमुग्धही होत असत. शाळा कॉलेजांमधील पाठ्यपुस्तकांमध्येही पाडगावकरांच्या कविता होत्या.

'बोलगाणी' हा त्यांनी काव्यरचनेवर केलेला एक वेगळा प्रयोग आहे. पाडगावकर यांचे 'भोलानाथ, 'बबलगम', 'चांदोमामा' हे बालकविता संग्रह प्रसिद्ध आहेत. १९६४मध्ये प्रकाशित झालेला 'वात्रटिका'हा त्यांचा कवितासंग्रह पाडगावकर यांची एक वेगळी ओळख करून देणारा ठरला आहे. पाडगावकर यांनी 'बायबल'ग्रंथाचा मराठी अनुवाद केला होता. अशा या थोर कवीचे ३० डिसेंबर २०१५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## कॉफीऐवजी 'ही' हेल्दी पेये तुम्हाला देतील ऊर्जा

परीक्षा जवळ आली की, आपल्यातील अनेकांना टेन्शन येण्यास सुरुवात होते. काही जण परीक्षेच्या काही महिन्यांअगोदर अभ्यास करण्यास सुरुवात करतात. तर काही अगदी पेपरच्या एक दिवस आधी संपूर्ण रात्र जागे राहून परीक्षेची तयारी करतात... यादरम्यान मुलाने वा मुलीने व्यवस्थित जागे राहून अभ्यास करावा यासाठी पालक त्यांना चहा किंवा कॉफी बनवून देतात. परीक्षेच्या काळात कॉफी ही खरी जीवनरक्षक आहे, असे म्हणतात. पण, निरोगी आहाराशिवाय तुम्हाला या दिवसांमध्ये बेस्ट रिझल्ट मिळणे कठीणच असते. तर हेच लक्षात घेऊन सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट पूजा मखिजा यांनी कॉफीऐवजी काही आरोग्यदायी पर्याय शेअर केले आहेत.



परीक्षेची तयारी करण्याच्या तणावपूर्ण काळात तुम्हाला ऊर्जा पातळी टिकवून ठेवणे आवश्यक असते. तेव्हा कॅफिनमुळे तीव्र ऊर्जा क्रॅश होऊ शकते. त्यामुळे डिहायड्रेशनचा सामना करण्यासाठी सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट पूजा माखिजा हिने ताज्या लिंबाचा सोडा, काही पुदिन्याच्या पानांसह संत्रे आणि लिंबाचा रस किंवा इलेक्ट्रोलाइटयुक्त नारळाचे पाणी पिण्याचा सल्ला दिला आहे.

सोडादेखील पिऊ नये बंगळुरू येथील क्लिनिकल न्यूट्रिशन अँड डायटेटिक्सच्या सेवा प्रमुख एडविना राज सांगतात, कॅफिन हा जास्त भार लघवीचे प्रमाण वाढवणारा पदार्थ म्हणून काम करतो आणि तुमच्या शरीरातून पाणी काढून टाकतो, ज्यामुळे निर्जलीकरण होते. त्यामुळे या काळात कॅफिनचा समावेश संयम राखून करावा.

तसेच कॅफिन जर माफक प्रमाणात समाविष्ट करायचे असेल, तर फळांनी भरलेले पाणी, आवळा व तुळशीच्या गोळ्या यांसारख्या नैसर्गिक पेयांमध्ये अँटिऑक्सिडंट्सच्या वाढीसह हायड्रेशनच्या अतिरिक्त स्रोतासह एकत्र केले पाहिजे. फळांचे स्मूदी, भाज्यांचे सूप, नारळाचे पाणी, हळद व मिरपूड घालून तयार केलेले ताक हे द्रवरूप पदार्थ डिहायड्रेशन टाळण्याचे काम करतात. अगदी मॅच लॅटमध्ये कॅफिनचा एक छोटा डोस असतो. अशा प्रकारे, तुम्ही परीक्षेची तयारी करताना सोडा किंवा साखरयुक्त पेये टाळणे तितकेच महत्त्वाचे आहे. तसेच फळे, भाज्या व पालेभाज्या, नट्स आणि बियांमध्ये असलेले ओमेगा-३ स्रोतांमधील अँटिऑक्सिडंट्सद्वारे पोषण देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

# श्रीवर्धन आगारातील दुरुस्तीचे काम निकृष्ट

**श्रीवर्धन : बातमीदार**



श्रीवर्धन परिवहन स्थानक अत्यंत जुने आहे. साधारण १९८६ ते ८७ च्या दरम्यान श्रीवर्धन परिवहन बस स्थानकाचे उद्घाटन करण्यात आले होते. बस स्थानकाच्या इमारतीला जवळ जवळ ४० वर्षे पूर्ण होऊन गेलेली आहेत. दरवर्षी पावसाळ्यामध्ये ही इमारत पूर्णपणे गळकी झालेली पाहायला मिळायची. सर्वत्र भिंतीवरून व स्लॅबमधून पाणी पाझरत असायचे. अशातच परिवहन स्थानकाचा कारभार या ठिकाणाहून सुरू होता.

श्रीवर्धन परिवहन स्थानकाच्या दुरुस्तीचे काम एका पुण्यात राहणाऱ्या परप्रांतीय ठेकेदाराला दिलेले असून, सदर ठेकेदाराकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आलेले आहे. स्थानकामध्ये अगोदरच असलेल्या फरश्यांवरती नवीन लाद्या बसवण्याचे काम सदर ठेकेदाराने केले असून, भिंतींना टाइल्स लावताना देखील योग्य पद्धतीचा वापर झालेला नाही.

सद्यस्थितीत परिवहन स्थानकाला केवळ रंग लावून चकाचक करण्यात आले आहे. श्रीवर्धन परिवहन स्थानकाची जागा मोठी असून या ठिकाणी अनेक खाजगी वाहने अवैधपणे पार्किंग केलेली नेहमीच पाहायला मिळतात. तसेच श्रीवर्धन परिवहन स्थानकामध्ये अनेक जण रात्री झोपायला देखील असतात. कारण त्या ठिकाणी परिवहन स्थानकाच्या आवारात एसटी महामंडळाने लावलेले फॅन रात्रभर चालवायला मिळतात. परिवहन स्थानकाच्या बाजूलाच एसटी महामंडळासाठी नवीन सीएनजी पंप बांधण्यात येत आहे.

सदरचा पंप एक एप्रिल पासून सुरू होईल असे सांगितले जात आहे. सदरचा सीएनजी पंप सुरू झाल्यानंतर श्रीवर्धन आगारामध्ये ४० नवीन सीएनजी गाड्या येणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापकांनी दिली आहे.

तसेच या सीएनजी पंपाच्या बाजूला खाजगी वाहनांना देखील सीएनजी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी श्रीवर्धन परिवहन स्थानकाच्या झालेल्या कामाची पाहणी विभाग नियंत्रकांनी करावी. त्याचप्रमाणे या ठिकाणी रात्री झोपायला असणारे फुकटे व अनधिकृत पणे आवारामध्ये गाड्या पार्किंग करणाऱ्यांवरती कारवाई करण्याची मागणी प्रवासी वर्ग मधून केली जात आहे.तसेच लातूर व बीड बसेस बंद करुन हरिहरेश्वर अक्कलकोट व श्रीवर्धन तुळजापूर बस चालू करण्याची मागणी प्रवाशांमध्ये केली जात आहे.

## मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर ट्रकची ट्रकला धडक; एक चालक ठार, दुसरा जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर सोमवारी सायंकाळी एका ट्रकने समोरील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने ट्रक पुढे जाऊन त्याने सुरक्षा कठड्याला धडक दिल्याने ट्रक एक्सप्रेसवेवर पलटी झाला, यात ट्रक चालक याचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा चालक जखमी झाला आहे

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर चालक मोहमद इब्राहिम जावेद (वय ३२) हा ट्रक पुण्याहून मुंबई कडे घेऊन जातं असताना तो आडोशी येथील नवीन बोगद्यात आला असता चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक देऊन ट्रक पुढे जाऊन सुरक्षा कठड्याला जोरदार धडक देऊन ट्रक पलटी झाला.

# तळा बाजारपेठेत मिरचीचे दर भडकले



**तळा : प्रतिनिधी**

तळा बाजारपेठ हे पुर्वीपासून मिरची विक्रीसाठी प्रसिद्ध आहे. सध्या बाजारपेठेत मिरची उपलब्ध झाली असून ग्राहकांची मिरची खरेदीसाठी बाजारात गर्दी वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

तळा बाजारपेठेत लवंगी मिरची २५० रूपये,बेडगी मिरची प्रकारानुसार ४०० ते ४५० रूपये,संकेश्वरी मिरची २५०ते ३५० रूपये,गटुंर मिरची २५० रूपये, काश्मिरी मिरची ७५० ते ८०० रूपये असे दर आहेत तसेच गरम मसाल्याचे पदार्थही वेगवेगळ्या प्रकारा नुसार बाजारपेठेत उपलब्ध झाले आहेत.

बाजारात मिरची दाखल झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांची मिरची खरेदीसाठी गर्दी होत असल्याचे पहावयास मिळत आहे.सध्या मिरचीचे भाव भडकले आहेत.हे भाव पुढे वाढणार असल्याचे म्हटले जात आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांची मिरची खरेदी करण्याची एक वेगळी अशी पध्दत आहे.ती म्हणजे गावातील दहा ते पंधरा महिलांचा एक डाला(समूह) तयार होतो.या डाल्यातील महिला वर्षभरासाठी पुरेल एवढी मिरची एकत्रित खरेदी करतात व तीचे दळण करून प्रत्येकाला नियमानुसार बसेल तेवढे तिखट दिले जाते.या एकत्रीत पणाने केलेल्या तिखट हा स्वस्त पडते व अर्थिक लाभ होतो.तसेच त्यांच्यामधून एक एकात्मतेची भावना रूजून एकात्मतेचे दर्शन घडते.होळी उत्सवात आलेले चाकरमानीही मिरची खरेदी करताना पहावयास मिळत आहेत.

# शिघ्रे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन मुरुड तालुक्यातील शिघ्रे ग्रामपंचायत प्रांगणात नुकतेच करण्यात आले .मुरुड महसुल मंडळातील पंचक्रोशीतील ग्रामस्थांना तहसिलदार आदेश डफळ यांच्या हस्ते ७५१ दाखल्यांचे वाटप करण्यात आले .

या शिबीरात शिघ्रे ग्रामपंचायत हद्दीतील ७/८ गावांतील महिला पुरुषांनी उपस्थिती दर्शवली होती . यावेळी व्यासपीठावर तहसिलदार आदेश डफळ, नायब तहसिलदार संजय तवर , राजश्री साळवी , शिघ्रे ग्रामपंचात सरपंच गुलाब वाघमारे , उप सरपंच हाफिजू कबले, तेलवडे ग्राम पंचायत उपसरपंच निलेश तांबडकर , ग्रामपंचायत सदस्य रुबीना बिरवाडकर , अमोल पाटील , सावली उपसरपंच मंदा ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते .

प्रलंबित फेरफार, ७/१२/ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८ अ उतारे , उत्पन्न, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्र आदी नागरिकांचे तसेच विद्यार्थ्यांच्या दाखल्यांचा समावेश होता .

तहसिलदार आदेश डफळ मार्गदर्शन करताना म्हणाले की, महसुल मंडळ निहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरात महसुल विभागातील अलिकडे झालेल्या नवीन कायद्यात झालेल्या बदलानुसार जनतेच्या उपयोगी शासन योजनांचा लाभ दिला जाणार आहे . अकृषक परवानगी , डिजिटल ७/१२ ला कायदेशीर वैधता , घरकुल योजना तसेच संजय गांधी निराधार योजना , श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना , इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना व राष्ट्रीय कुटूंब लाभ अर्थसहाय्य योजने साठी लागणाऱ्या कागद पत्रांची पुर्तता करून जास्तीत जास्त नागरिकांनी या शासन योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले .



# पोलिसाकडून भूतदया



**माणगाव : बातमीदार**

राज्यात वातावरणात फार मोठया प्रमाणात बदल होत आहे. संपूर्ण राज्यात उष्णतेचे प्रमाणवाढले असून या उष्णतेचा परिणाम माणसांना सुद्धा होत असताना पाळीव प्राणी व वन्य प्राण्यांना सुद्धा तितकाच होत असतो.

वन्य प्राणी हे तहानलेले असतात, पाळीव प्राण्यांना मुबलक पाणी त्यांच्या मालकाकडून मिळत असते. परंतु वन्य प्राणी पाण्यासाठी जंगलात वनवण भटकत असतात. काही वेळा वन्य प्राणी खेडेगावात सुद्धा येत असतात. याचेच एक उदाहरण माणगांव पोलीस ठाण्यातील वाहतूक पोलीस शिवराजे बांडे त्यांचे कर्तव्य पार पाडत असताना माकड पाण्यासाठी भटकत असताना त्यांना दिसला असता त्यांनी पाणी बॉटल घेतली व त्याच्यातील पूर्ण पाणी त्या माकडाला पाजले.

खाकीतील ताकद आणि मनातील माया तहान फक्त माणसांनाच नाही प्राण्यांनाही लागते, वर्दी फक्त कर्तव्याची नसते माणुसकीचीही असते.मानवजातीला या घटनेचा आदर्श घेण्यासारखा आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहो, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे मोहो, तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १०८ | ३ | ०–२८–०० | ०–०१–५० | ०–२९–५० | ५.८१ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०३/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९



## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**अग्निशमन विभाग**

**दरपत्रके मागविण्यास सुचना**

**पनवेल महानगरपालिकेस सन २०२५–२६ या वित्तीय वर्षाकरीता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार,** पनवेल महानगरपालिकेच्या पनवेल अग्निशमन केंद्रातील अग्निशमन वाहन क्र. MH ४६ BM ०९६१, MH ४६ BM ३५१४, MH ०२ GH ४८९७ या वाहनांचे विमा नुतनीकरण करणेबाबत **पात्र व इच्छुक संस्था / नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडुन सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती** www.panvelcorporation.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर दिनांक** २४/०२/२०२६ रोजी पासुन उपलब्ध आहे.

दिनांक :– ०९/०३/२०२६
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.५४/६३/२०२६

**सही/–**
**(कैलास गावडे)**
उपआयुक्त (मुख्यालय – I)
पनवेल महानगरपालिका



**INDIABULLS GREENS CO.OP. HSG.ASO. LTD.**
Indiabulls Greens CO.OP Hous. Association Ltd. 5C, Aster CHS, Kon, Post-Ajivali, Tal.Panvel, Dist.Raigad.

**TENDER NOTICE**
**SECURITY SERVICES**
CONCOR invites sealed tender for the following work:-

| | |
|---|---|
| TenderN.& Date | Ref.: Masik Sabha Dated : 01/03/2026 CONCOR/IBG/SOC/ **SECURITY SERVICES** 2025-26 Dated |
| Description of Work | Tender for hiring of **SECURITY SERVICES** |
| Cost ofTender Document | Rs.2000/-(Rs.TwoThousand Only) including GST |
| Earnest Money Deposit | Rs.1,00,000/- (Rs. One Lakh Only) |
| Mode of Payment (Bank Details) | Draft favoring" IBGreensCo-Op Housing Association. Ltd."atPanvel (Ac No. 42953558163) IFSC Code SBIN0000448) Bank Name–Panvel |
| Contract Period | 1 year |
| Dt. of Sale of Tender Document | From 11/03/2026TO 17/03/2026 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm APEX Office |

Date of Tender Submission Before 17.00Hrs. on 21/03/2026
Tender Opening Date: 22/03/2026-11.00a.m.at APEX Office

तारीख : **10/03/2026** सही/ सही/
स्थळ : पनवेल अध्यक्ष सचिव
इंडिया बुल्स ग्रीनस को. ऑप. हाऊसिंग असो.. लिमिटेड



**INDIABULLS GREENS CO.OP.HSG. ASSO. LTD.**
Indiabulls Greens CO.OP CHS Association Ltd. 5C, Aster CHS, Kon ,Post-Ajivali, Tal.Panvel, Dist.Raigad.

**TENDER NOTICE**
**HOUSE KEEPING SERVICES**
CONCOR invites sealed tender for the following work:-

| | |
|---|---|
| TenderN.& Date | Ref.:Masik Sabha Dated : 01/03/2026 CONCOR/IBG/SOC/SECURITY Services 2025-26 Dated 11/03/2026 |
| Description of Work | Tender for hiring of **Manpower ( for Housekeeping ,Gardening, office and technical work )** |
| Cost of Tender Document | Rs.2000/-(Rs.Two Thousand Only) including GST |
| Earnest Money Deposit | Rs.1,00,000/-(Rs. One Lakh Only) |
| Mode o fPayment (Bank Details) | Draft favoring" IBGreens Co- Op Housing Association. Ltd."at Panvel (Ac No. 42953558163) IFSC Code SBIN0000448) Bank Name – Panvel |
| Contract Period | 1 year |
| Dt.of Sale of Tender Document | From11/03/2026TO 17/03/2026 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm (APEX Office) |

Date of Tender Submission Before 17.00Hrs.on 21/03/2026
Tender Opening Date:22/03/2026- 11.00a.m.at SocietyOffice

तारीख : **10/03/2026** सही/ सही/
स्थळ : पनवेल अध्यक्ष सचिव
इंडिया बुल्स ग्रीनस को. ऑप. हाऊसिंग असो.. लिमिटेड



**Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe**

Plot No:- 240,241 Sector -24 Pushpak node, Ulwe Tal-Panvel, Dist. - Raigad. Phone: -022-27212031

## Tender Notice

Tenders are invited from the reputed firms/ companies by filling up the form for Tendering process for the Proposed interior work of School admin office & staff room.

The detail information of tender / tender process is available at our school admin office from 10/03/2026.Tender must be submitted to the admin office of Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe, before16/03/2026 upto 5.00 pm.

| Name of work | Estimated Cost | Blank Tender Cost |
|---|---|---|
| Proposed interior work of School admin office & staff room. | Rs. 10,82,000 /- | Rs. 1,000 /- (non refundable) |

Sd/-
**Principal,**
Sau. Shakuntala Ramsheth Thakur School,Ulwe



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल **एलटीपीएस इन्फ्रा प्रा. लि.** (LTPS infra Pvt. Ltd.) तर्फे भागिदार **१) श्री. लहू लक्ष्मण पाटील, २) प्रशांत लहू पाटील हे कै. किसन जाना पारगांवकर (मयत) व कै. बयवबाई किसन पारगांवकर** (मयत) तर्फे **वारस :– १) श्री. सुनिल किसन पारगांवकर, २) श्री. अनिल किसन पारगांवकर, ३) श्री. मिलिंद किसन पारगांवकर,** सर्व रा. तरघर गाव, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड यांचे भाडेपट्टा मालकी हक्काचा खालील वर्णनाचा भुखंड त्यांच्याकडून त्रिपक्षीय भाडेपट्टा कराराने आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाने आपले लाभात कायमस्वरूपी भाडेपट्टा मालकी हक्काने हस्तांतरीत करून घेण्याचे योजले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे/नोड | भुखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ, ता. पनवेल जि. रायगड | ३२ | आर–४ | १८० चौ.मी. |

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक : ०९/०३/२०२६

सही /
**निलेश द. हातमोडे**
ॲडव्होकेट

पत्ता :– शॉप नं. १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहीला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो.नं. ८१०८५५८२८९



## जाहीर नोटीस

जाहीर सुचना देण्यात येते की, माझे अशिल **मे. सुविधा इंटरप्रायझेस (भागीदारी संस्था) यांचा कार्यालयीन पत्ता – शॉप नं. ०१, प्रथम रेसिडेन्सी, प्लॉट नं. ८३ ए, सेक्टर ५२, द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड.,** यांच्या लाभांत मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील गावठाण विस्तार योजनेअंतर्गत खालील परिशिष्टात वर्णन केलेला भुखंड हा हस्तांतरीत करण्यात आलेला आहे आज रोजी मे. सिडको दप्तरी सदर भुखंडाचा परवानाधारक म्हणून माझ्या अशिलांच्या नावाची नोंद आहे.

**भुखंडाचा तपशिल**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. मध्ये |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड | ३२ | ४७ | ६५९४.२८ चौ.मी. |

यामुळे माझे अशिलांनी सदर भुखंडावर नियोजित इमारतीचे प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे परंतु सदर भुखंडावर प्रकल्प राबविण्यापुर्वी त्या प्रकल्पाची सविस्तर नोंदणी **''महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण''** यांच्याकडे करणेकरीता सदर भुखंडासंदर्भात **''टायटल सर्टिफिकेट''** देणे गरजेचे असते त्यामुळे माझे अशिलांनी मला सदर भुखंडाच्या ''टायटल सर्टिफिकेट'' मिळणेबाबत विचारणा केली असल्याने मी सदर भुखंडाचे ''टायटल सर्टिफिकेट'' त्यांस देण्यास मान्यता दिलेली आहे.

परंतु तत्पूर्वी सदर भुखंडासंदर्भात जर कोणाही व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भुखंडावर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिन भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृटयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत /हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या** आत सादर करावे आणि जर तसे केले नाही तर सदर भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनांपासून मुक्त आहे असे गृहित धरुन माझ्याकडून माझ्या अशिलांना सदरहु भुखंड हा चोख व मार्केटेबल आहे असे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल आणि मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे,
दिनांक : ९/०३/२०२६

सही/–
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**

पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८

# मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी नवी मुंबई महापालिकेची गतिमान मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

मालमत्ता कर हा नवी मुंबई महापालिकेच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत असून या महसूलातूनच नवी मुंबईकर नागरिकांना दर्जदार सेवा सुविधा पुरविणे महानगरपालिकेस शक्य होत असते. देशातील व राज्यातील नवी मुंबईसारख्या इतर मोठ्या शहरांशी तुलना करता नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ताकराचा दर सर्वात कमी आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने शहर विकासामध्ये आपले योगदान देण्याकरिता मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर कर विहित वेळेत भरणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून सातत्याने जनजागृती करण्यात येत असते. तथापि थकबाकीदारांचे प्रमाण मोठे आहे.

सन २०२५-२६ या अर्थिक वर्षात महानगरपालिकेकडे आत्तापर्यंत ६६५ कोटी रक्कम मालमत्ता करापोटी जमा झालेली असून ३१ मार्चपर्यंत जास्तीत जास्त मालमत्ता कर जमा व्हावा यादृष्टीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विशेष बैठक घेत मालमत्ताकर वसूलीला अधिक गती द्यावी असे स्पष्ट निर्देश मालमत्ताकर विभाग व कराची प्रत्यक्ष वसूली करणारी विभाग कार्यालये यांना दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त



डॉ. अमोल पालवे व इतर विभागांचे सहाआयुक्त आणि मालमत्ता कर वसूलीशी संबधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्तांनी आठही विभाग कार्यालयांमार्फत आत्तापर्यंत झालेल्या मालमत्ताकर वसूलीचा आढावा घेतला व प्रत्येक विभागाला ३१ मार्चपर्यंत वसूलीचे उद्दिष्ट दिले. यापुढील काळात संबधित अधिकारी, कर्मचारी यांनी जास्त वेळ कार्यालयात न थांबता क्षेत्रीय स्तरावर वसूलीसाठी ठोस प्रयत्न करावेत असेही निर्देशित करण्यात आले.

मालमत्ता कर थकविणाऱ्या मालमत्ता धारकांची थकीत मालमत्ता कराच्या उतरत्या क्रमाने विभागनिहाय यादी तयार करण्यात आली असून ही यादी सर्व विभाग कार्यालयांना वितरित करण्यात आली आहे. यामधील जास्त रक्कमेच्या थकबाकीदारांवर कारवाई तीव्र करावी असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी या बैठकीत दिले. अन्यथा सदर थकबाकीदारांवर जप्तीची कठोर कारवाई करण्यात यावी, असेही निर्देशित करण्यात आले आहे.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आपल्या शहराच्या विकासासाठी नागरिकांनी मालमत्ता कर व थकबाकी असल्यास तिचा त्वरित भरणा करुन कर्तव्य भावनेने योगदान द्यावे, असे आवाहन केले आहे.

# वाशी येथे महिला दिनानिमित्त पुरस्कार आणि बक्षीस वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे झालेल्या नवी मुंबई महानगरपालिका महीला व बालकल्याण समितीद्वारा आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त महिला उद्योजगता पुरस्कार व स्वच्छता अभियान पुरस्कार वितरण व विविध स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभांप्रसंगी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांची मुख्य अतिथी म्हणून उपस्थिती लाभली.



यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, समाजातील प्रत्येक महिला सुरक्षित, सक्षम आणि स्वावलंबी झाली तरच खऱ्या अर्थाने प्रगती साध्य होईल. तसेच महिलांना शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या संधी आणि स्वावलंबनाच्या दिशा देण्यासाठी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. महिला आणि बालकांचे कल्याण हेच समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पायाभूत तत्त्व आहे. या महिला दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी एकत्र येऊन महिलांच्या सन्मानासाठी, समानतेसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार केला व सर्व उपस्थित महिलांना आमदार मंदा म्हात्रे यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या,

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रथम नागरिक महापौर सुजाता पाटील, उप महापौर दशरथ भगत तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे सभागृह नेता, समितींचे सभापती व प्रभाग समितींचे सभापती तसेच नगरसेविका, नगरसेवक आणि समस्त महिला व बालकल्याण समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करावे -शैला बेंद्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

कुठलेही माध्यम येवो पण वाचनाचा आनंद लुटता येतो लिखित वाचताना म्हणून नियमित वाचन करावे, असे आवाहन बाळाराम हायस्कूलच्या मुख्याधापिका शैला बेंद्रे ह्यांनी कवी कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालयातर्फे आयोजित आंतरशालेय काव्यवाचन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषक वितरण समारंभात केले.

मराठी भाषा पंधरवड्यात ह्या वाचनालयाचे ही स्पर्धा आयोजित केली होती. ही स्पर्धा फक्त नेरूळ सीवूड परिसरात असलेल्या शाळेपुरती मर्यादित होती त्यामुळे चार शाळेतील २४ मुलांनी भाग घेतला होता त्यात २०२६ के.प्रविण पाटील करंडक नेरूळ येथील विद्याभवन ह्या शाळेने मिळवला.

ह्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून शैला बेंद्रे ह्यांनी उपस्थ विद्यार्थी, पालक ह्यांना उद्देशून बोलताना वाचनाचे महत्त्व सांगितले पालकांनी मुलाशी बोलताना जास्तीत जास्त मराठीत बोलावे असे आवाहन केले. स्पर्धेतील चार परीक्षक यांनी आपले मत व्यक्त केले.

प्रारंभी स्पर्धेचे संयोजिका प्रज्ञा ललिंगकर यांनी स्पर्धेविषयक माहिती दिली त्यात काव्य स्पर्धा ही नवी मुंबईत प्रथमच होत आहे असे सांगितले. ह्या स्पर्धातील वैयक्तिक पारितोषक प्रथम क्रमांक विद्याभावन शाळेतील प्रांजल अभंग, द्वितीय क्रमांक एस एस हायस्कूलमधील श्रेय गावडे, तृतीय क्रमांक विद्याभवनच्या उल्का गावडे तर उत्तेजनार्थ पारितोषिक क्षितीज गव्हाणे यांनी प्राप्त केले.

यावेळी जयवंत पाटील यांनी पाठांतर, शब्द बोलताना कुठे जोर द्यावा ह्या बाबतीत मार्गदर्शन केले.

# उरणमध्ये महिलांचा अस्तित्व नारी सन्मान

**उरण : वार्ताहर**

कलश एंटरटेनमेंट वतीने जागतिक महिला दिनाचे औचीत्त साधून शनिवारी (दि.७) अस्तित्व नारी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन अंगण लॉन नागाव येथे करण्यात आले. यंदाचे तिसरे वर्ष होते.

ऋया कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध सिने अभिनेत्री निशिगंधा वाड उपस्थित होत्या. कलश एंटरटेनमेंटच्या संस्थापक श्लोक निखील पाटील, सहसह संस्थापक कल्पना समीर सुर्वे यांनी ढोल ताशांच्या गजरात सर्व सर्व पाहुण्यांचे स्वागत केल. व्यासपीठावर शैलजा सुधीर घरत, आरती ढोले, नीता महेश बालदी आदी मान्यवरांच्या हस्ते महिलांना अस्तित्व नारी सन्मान, चिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

अभिनेत्री निशिगंधा वाड यांनी महिलांचे अस्तित्व अणि सत्व या विषयी मार्गदर्शन केले. महिलांना त्यांच्या कार्याची ओळख समाजाला देणे हाच उदेश आहे, असे श्लोक पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले.




विविध क्षेत्रात कामगिरी करणारी केलेल्या २४ महिलांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, सन्मान पत्र देवून सन्मानित करण्यात आले त्यात अर्पिता मुखर्जी, रंजिता पाटील, आरती ढोले, रोमाशा सिंग, कीर्ती कवळे, पायल स्वरूप, प्रियांका आजगोन्कर, आरपीएफ शोभा मोटे, मोहिनी पुजारी, माधवी म्हात्रे, अश्मिक कामठे, गौरी क्षीरसागर, सिनिअर पोलीस निरीक्षक विमल बिडवे, कांचन राउत, डॉ. लता नाखवा, निशा शिरधनकर, माधवी पाटील, सीमा पाटील, कलावती उपाध्ये, प्रियांका घरत, दिशा मशीलकर, प्रीती पाटील, श्रुतिका वांद्रे, प्रियांका आसरकर, प्रियवंदा तांबोटकर आदींना अश्मिक कामठे, अस्थित्व नारी सन्मान देवून सन्मानित करण्यात आले.

याचप्रमाणे गिफ्टटिंग पार्टनर स्वप्ना महाडिक, गिफ्टटिंग पार्टनर दीपिका माळी, गिफ्टटिंग पार्टनर सरिता म्हात्रे, गिफ्टटिंग पार्टनर सोनल जैन, कलश फॅशन डिझायनर जागृती पाटील, यांना हि सन्मानित करण्यात आले. सर्व नगरसेविका यांचा सन्मान करून सत्कार करण्यात आला. संग्राम तोगरे यांचा हि सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास सल्लागार प्रशांत गायकवाड, निखील पाटील व समीर सुर्वे यांचे सहकार्य मिळाले. सुत्रसंचालन दीपक शेट्टी यांनी केले. शर्मित भाईजी बडीगर, चंदुकाका सराफ, ममता म्हात्रे, अन्तोफित, सोमय्या सिंग अभिजित लोटलिकर, कामगार नेते सुधीर घरत, अनीता प्रवीन घरत, डॉ.सत्य नारायण ठाकरे, डॉ, घनशाम पाटील अमित ढोले आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महिला पोलीस अधिकारी व उरण नगर परिषद सफाई महिला कामगार यांचाही सन्मानित करण्यात आले. कलश एंटरटेनमेंटच्या संस्थापक श्लोक निखील पाटील, सहसह संस्थापक कल्पना समीर सुर्वे यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

# नारीशक्ती उत्सवातून महिलांना व्यासपीठ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा शहर मंडळाच्या वतीने पनवेलमध्ये नारीशक्ती २०२६ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील गुजराती शाळेच्या मैदानावर शनिवारी आणि रविवारी असे दोन दिवस विविध उपक्रमांनी हा सोहळा रंगला. या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरलेला समागंध प्रस्तुत गाणी तिच्या मनातील हा सुमधुर गाण्यांचा सुरेल कार्यक्रम रविवारी पार पडला. यामध्ये गायिका साई जोशी, गीता पुराणिक, शाकंभरी बगाडे आणि श्रावणी भिडे यांनी आपल्या बहारदार गायनाने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले, तर अश्विनी भिडे यांनी आपल्या खुमासदार निवेदनाने कार्यक्रमात रंगत भरली.

दोन दिवस चाललेल्या या नारीशक्ती उत्सवात महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वैविध्यपूर्ण स्पर्धा आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पाककला स्पर्धा, आरी वर्क वर्कशॉप, मेहंदी वर्कशॉप आणि पॉटरी वर्कशॉप यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता. महिलांमधील सुप्त कलागुणांना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात सहभागी झालेल्या महिलांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला नगरसेविका प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, शिवानी घरत, माजी नगरसेविका नीता माळी आदी उपस्थित होते.



**पनवेल : भाजप युवा नेते परेश ठाकूर यांची पनवेल महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याने कामगार नेते रवी नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले.**

# पनवेलची चिमुकली मायरा पाटीलचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील मायरा नरेंद्र पाटील या चिमुकलीने अत्यंत कमी वयातच आपल्या बुद्धिमत्तेचे प्रदर्शन दाखवत महत्वाचे पुरस्कार प्राप्त केले आहेत. एक वर्ष नऊ महिने वयोमान असलेल्या विविध स्पर्धात्मक परिक्षांची अचूक तोंडी उत्तरे देऊन हे पुरस्कार प्राप्त केले आहेत.

यामध्ये प्राईड ऑफ महाराष्ट्र अवॉर्ड २०२६ अंतर्गत यंग प्रॉजीडी ऑफ महाराष्ट्र हा पुरस्कार अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये आयबीआर पदवी बहाल करण्यात आली. याव्यतिरिक्त अवघ्या सात महिन्यांची असताना इन्फ्लुएन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स या पुरस्काराने मायराला सन्मानित करण्यात आले. फ्लॅशकार्ड्स ओळखणारी सर्वात लहान मुलगी ठरली.

मायराने १५ फळे, १५ भाज्या, शरीराचे ९ भाग,५ बुद्धिबळातील सोंगट्या, ११ पक्षी, १५



समाजसेवक, १८ वाहने, १२ पाळीव प्राणी, २४ जंगली प्राणी, इंग्रजी वर्णमालेतील सर्व अक्षरे एक इंग्रजी कविता म्हणून दाखवल्याने मायराची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये करण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही मायराचे कौतुक व कुटुंबियांचे अभिनंदन केले.

# विधी महाविद्यालयात इम्पल्स महोत्सव



**खारघर : रामप्रहर वृत्त**

गोखले एज्युकेशन सोसायटीचे विधी महाविद्यालय, खारघर येथे वार्षिक महोत्सव 'इम्पल्स २०२५-२६'चे आयोजन २१ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागासह यशस्वीरित्या पार पडले. क्रीडा, सांस्कृतिक, बौद्धिक आणि सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देणारा हा महोत्सव ठरला.

महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य नरेश पाटील व कार्यवाहक प्राचार्या डॉ. श्रुती निलेश जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. २२ फेब्रुवारी रोजी क्रिकेट, बॅडमिंटन, रिले रेस, दोरखेच खेच आणि व्हॉलीबॉल या मैदानी क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. २४ फेब्रुवारी रोजी वादविवाद व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २५ फेब्रुवारी रोजी चित्रकला, मेहेंदी, रांगोळी, फायरलेस कुकिंग, छायाचित्रण आणि रील मेकिंग अशा विविध सर्जनशील स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. २६ फेब्रुवारी रोजी कॅरम, बुद्धिबळ आणि म्युझिकल चेअर स्पर्धा तसेच पारंपरिक दिन आणि मातृभाषा राजभाषा दिन साजरा करण्यात आला. २८ फेब्रुवारी रोजी नृत्य व गायन स्पर्धा तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला.

या कार्यक्रमाच्या समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून गोखले एज्युकेशन सोसायटी, खारघर शाखेचे सचिव प्रा. शुभराज बुवा उपस्थित होते. तसेच गुरु स्कूलच्या प्राचार्या सविता परब या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्राचार्य नरेश पाटील यांचीही विशेष उपस्थिती लाभली होती.

संपूर्ण महोत्सवाचे नियोजन व व्यवस्थापन सहाय्यक प्राध्यापिका पूजा चव्हाण व सहाय्यक प्राध्यापिका अमृता सूर्यवंशी यांनी यशस्वीरित्या पार पाडले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका साक्षी रहाटे यांनी केले.

# पोदी येथील स्मशानभूमीची पुनर्बांधणी करा

## नगरसेवक मनोज भुजबळ यांची निवेदनाद्वारे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर नं. १६ येथील पोदी स्मशानभूमी पुन्हा विकसित करावी अशी मागणी पनवेल महापालिकेचे नगरसेवक मनोज भुजबळ यांनी पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नवीन पनवेल सेक्टर १६ येथील पोदी स्मशानभूमी ही एकमेव स्मशान भूमी आहे. ही स्मशानभूमी पुन्हा विकसित करणे व सर्व सोईनियुक्त करणे गरजेचे आहे. स्मशानभूमीवर प्रचंड ताण असल्याने व तेथील सर्व गैरसोईमुळे मरणानंतर सुध्दा रहिवासियांना खुप त्रास सहन करावा लागतो. तसेच स्मशानालगत इलेक्ट्रीक टॉवर लाईनचे खालील म्हणजेच विचुंबे रोडलगतच्या जागेचा वापर मयत लहान मुले व काही हिंदू चालीरीतीप्रमाणे मोठ्या व्यक्तींना मृत्युनंतर दफन करण्याची प्रथा आहे.

अशा वेळेस सध्या असलेली जागा कमी पडत असून सदर रोड व स्मशान भूमीची भिंत (टॉवर लाईन खालील जागा) ही जागा दफन भूमीसाठी ताब्यात घ्यावी अशी मागणीदेखील नगरसेवक मनोज भुजबळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# ऊसाच्या रसाला नागरिकांची पसंती



**पनवेल : वार्ताहर**

मार्च महिन्याची उष्णता सुरू होताच शहरात उकाडा जाणवू लागला असून नागरिक उन्हापासून बचाव करण्यासाठी विविध उपाय करताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत तापमान वाढत असल्याने रस्त्यांवरील उसांच्या रसाच्या गाड्यांवर नागरिकांची गर्दी वाढली आहे.

थंडगार उसाचा रस पिण्यासाठी अनेक जण थांबत असल्याचे चित्र दिसतं आहे. विशेषतः महिला वर्ग उन्हापासून बचावासाठी स्कार्फ बांधून बाहेर पडताना दिसत आहेत. काहीजण टोपी, गॉगल तसेच रुमालाचा वापर करत आहेत. उन्हाचा तडाखा वाढल्याने अनेक नागरिक झाडांच्या सावलीचा आधार घेत थोडा विसावा घेताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत रस्ते काहीसे ओस पडत असले तरी थंड पेये व उसाच्या रसाच्या ठेल्यांवर मात्र चांगली वर्दळ पाहायला मिळत आहे.

# उन्हाचा तडाखा वाढल्याने बाजारात लिंबांना मागणी वाढली

**■ दरही चढे राहण्याची शक्यता**

**नवी मुंबई : बातमीदार**

उन्हाचा तडाखा वाढू लागला असल्याने आता बाजारात लिंबूची मागणी वाढली आहे. मात्र लिंबाची आवक मर्यादित होत असल्याने लिंबूचे दर वाढले आहेत. एका लिंबूसाठी किरकोळ बाजारात दहा रुपये मोजावे लागत आहेत. पावसाळा सुरू होईपर्यंत लिंबाचे दर चढेच राहणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

मागच्या पंधरा दिवसांपासून तापमानात कमालीची वाढ जाणवत आहे. होळी झाल्या नंतर तर उन्हाचा तडाखा आणखीनच वाढला आहे. येत्या काही दिवसात वातावरणातील तापमान आणखीन वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाढणाऱ्या उष्णतेने बाजारात थंड सरबते, फळांचे रस यांना मागणी वाढली आहे. त्यात लिंबाच्या सरबताना मोठी मागणी आहे. शिवाय रोजच्या जेवणात हि अनेक लोक लिंबाचा वापर करत असल्याने सध्या बाजारात लिंबाना मागणी आहे. त्यामुळे मागणीत झालेली वाढ पाहता दर वाढलेले असल्याचे व्यापारी सांगत आहेत.



सध्या घाऊक बाजारात लिंबाचे १२ ते १४ टेम्पो इतकी आवक होत आहे. बाजारात एकूण साडे चारशे क्विंटल इतकीच लिंबाची आवक होत आहे. ही आवक फारच कमी आहे. त्यामुळे. घाऊक बाजारात लिंबू २०००ते ३००० रुपये शेकडा झाले आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारात लिंबू महागले आहेत. किरकोळ बाजारात सर्व साधारण आकाराचा एक लिंबू १० रुपये या प्रमाणे विकला जात आहे. तर मोठ्या आकाराचा लिंबू अगदी २० रुपयेदेखील आहे. शिवाय फारच लहान आकाराचे लिंबू ही बाजारात आहेत. जे दहा रुपयांना दोन मिळत आहेत, मात्र त्यात रस निघत नसल्याची तक्रार आहे.

# कर्जतमधील सराईत गुन्हेगार तडीपार

**कर्जत : प्रतिनिधी**

पोलीस ठाणे यांचेकडील रिपोर्ट. एकुण ६ सामाईक गुन्हे, ४ स्वतंत्र गुन्हे व एकुण १७ अदखलपात्र गुन्हे टोळीतील टोळी प्रमुख व टोळी सदस्य अशा चार जणांना दोन वर्षे मुदतीकरीता रायगड जिल्हयातून तसेच रायगड जिल्हयाचे लगतचे असलेल्या पुणे, मुंबई, नवी मुंबई व ठाणे या जिल्हयांतुन हददपार करण्याचे आदेश रायगड पोलीस अधीक्षक यांनी निर्गमीत केले आहेत. हे चारही गुन्हेगार कर्जत शहरातील आमराई येथे राहणारे आहेत.

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आमराई येथे राहणाऱ्या टोळी प्रमुख सुरज राम जाधव, वय २५ वर्षे, टोळी सदस्य सोमनाथ साळुंखे, वय २४ वर्षे, सिध्दीकी अन्सारी, वय २५ वर्ष, मारुती जाधव, वय ३० वर्षे, या चार जणांच्या टोळीने एकुण ०६ सामाईक गुन्हे, ४ स्वतंत्र गुन्हे व एकुण १७ अदखलपात्र गुन्हे केले आहेत. रायगड जिल्हयातील कर्जत पोलीस ठाणे हद्दीत राहणारे इसमांच्या हे त्यांची गुन्हेगारी टोळी तयार करुन सातत्याने व सलगपणे शरिराविरुध्दचे गुन्हे करीत आहेत. त्यांचे विरुध्द दाखल दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे पाहता ते धोकादायक व धाडसी वृत्तीचे सराईत गुन्हेगार बनले आहेत.




तसेच ते यापुढे यापेक्षा गंभीर गुन्हे करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करुन सार्वजनिक शांतता भंग घडवून आणण्याची परिस्थिती निर्माण झालेली असून त्यांच्यापासून सर्वसामान्य नागरिकांच्या जिवित व मालमत्तेचे संरक्षण करण्याची नितांत गरज निर्माण झालेली आहे.

ही टोळी त्यांच्या आर्थिक फायद्याकरिता तसेच त्यांची दहशत निर्माण व्हावी या उद्देशाने कर्जत शहर व परिसरात त्यांच्या इच्छेविरुध्द कोणाही सर्वसामान्य नागरिकाने त्यांना विरोध केल्यास अशा लोकांच्या विरुध्द सराईतपणे बेकायदेशिर जमाव करुन तसेच गरजेनुसार स्वतःच आक्रमक होऊन शरिराविरुध्दचे गुन्हे सातत्याने व सलगतेने करीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात या टोळीविषयी भिती व दहशत निर्माण झालेली आहे.

टोळी प्रमुख तसेच टोळीतील सदस्य हे अत्यंत धाडसी व बेडरवृत्तीचे झालेले असून त्यांचविरुध्द दाखल गुन्हयात त्यांना अटक करून त्यानंतर ते बाहेर सुटल्यावर त्यांचे गुन्हेगारी कृत्य सुरूच ठेवले आहे. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करून देखील त्यांचेत सुधारणा होत नाहीत. यावरुन त्यांना कायदयाचा धाक राहीलेला नाही असे दिसून येते.

त्यामुळे त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना पायबंद घालण्याकरिता, समाजातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता, सर्वसामान्य नागरीकांना शांततामयरित्या त्यांच्या जीवनाचा उपभोग घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्याकरिता आणि टोळी प्रमुख आणि टोळीतील सदस्य यांच्या वर्तणूकीमध्ये सुधारणा व्हावी, ते करीत असलेली गुन्हयांची मालिका खंडीत व्हावी आणि त्यांच्यावर प्रचलीत कायद्याचे बंधन रहावे याकरिता पोलीस अधीक्षक, रायगड अलिबाग यांनी टोळीतील इसमांना दोन वर्षे मुदतीकरीता रायगड जिल्हयातुन तसेच रायगड जिल्हयाचे लगतचे असलेल्या पुणे, मुंबई, नवी मुंबई व ठाणे या जिल्हयांतुन हद्दपार करण्याचे आदेश निर्गमीत केले आहेत.

# माणगावात महसूल विभागामार्फत महाराजस्व समाधान शिबिर सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशाप्रमाणे महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१ ची घोषणा करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने माणगाव तालुक्यामध्ये प्रत्येक मंडळ स्तरावर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



त्याअनुषंगाने १८ फेब्रुवारी २०२६ ते दि.५ मार्च २०२६ या कालावधीमध्ये माणगाव तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी व तहसील कार्यालय माणगाव येथील अधिकारी / कर्मचारी यांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन गाव भेटीद्वारे अभियानाबाबत जनजागृती करून लोकांचे अर्ज प्राप्त करून घेतले तसेच शाळेय विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या दाखल्यासाठी प्रत्येक शाळेत जाऊन दाखल्यासाठी अर्ज प्राप्त करून घेतले. शनिवार ७ मार्च २०२६ रोजी मंडळ लोणेरे अंतर्गत एस. एस. निकम हायस्कूल लोणेरे येथे शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराच्या वेळी मंत्री भरत गोगावले यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सदर अभियानाबाबत मार्गदर्शन केले तसेच महसूल विभागाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल महसूल विभागाचे अभिनंदन केले. सर्व लाभार्थ्यांना या शिबीराचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले.

शिबिरामध्ये माणगाव तालुक्यातील महसूल विभागामार्फत व इतर शासकीय विभागामार्फत त्यांच्याकडील सेवा नागरिकांना देण्यात आल्या. महसूल विभागामार्फत २४ उत्पन्नाचे दाखले, ११ वय अधिवास दाखले, ८ नॉनक्रिमिलेअर दाखले,४० जातीचे दाखले वाटप करण्यात आले. तसेच जिवंत ७/१२ अंतर्गत मयत व्यक्तीच्या वारसांची नोंद घेऊन व प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करून ३२ लाभार्थ्यांना शिबीर ठिकाणी डिजिटल ७/१२ व ८ अ वाटप करण्यात आले. २९ फेरफार निकाली काढण्यात आले. १६ लाभार्थ्यांचे आधार दुरुस्ती व १ लाभार्थ्यांचे नवीन आधारकार्ड करीता नोंदणी करण्यात आली.

## खालापूरमध्येही अभियानास प्रारंभ

**चौक : प्रतिनिधी**

भूमी अभिलेख खालापूर यांच्या कडून नागरिक यांना वेळीच कागदपत्रे देण्याची व्यवस्था आणि महाराजस्व अभियानाला सुरुवात केली आहे.

सर्व नागरिक व शेतकऱ्यांना पेरणी, मशागत, शेतमाल वाहतूक यासाठी बारमाही शेतरस्ते देणारी योजना, माल पत्रक, मालमत्ता स्वाभिमान, इ-पीसीआयएस आणि स्वामित्व योजनेअंतर्गत डिजिटल मिळकत पत्रिका उपलब्ध, एकत्र कुटुंबाचे जमिनीचे विभाजन करणेबाबत मोहीम, नोंदणीकृत वाटपपत्र / का. क. ८५ चे आदेशासह, २०० मध्ये पोट हिस्सा मोजणी,

७/१२ व नकाशा मेळात येणार. या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतं आहेत, जनतेने जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन भूमी अभिलेख खालापूर यांनी केले आहे.

प्रमोद जरग उप अधीक्षक भूमी अभिलेख खालापूर, उत्तम केंद्रे, कार्यालयीन अधीक्षक समाधान पाटील, शिरस्तेदार भाऊसाहेब मुंडे, कैलास शेंडगे अरविंद खांडेकर उज्ज्ञन कोळेकर भूकरमापक यांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.



# थेरोंडा पानसेवाडी येथे होळीनिमित्त क्रीडा महोत्सव



**रेवदंडा : प्रतिनिधी**

थेरोंडा पानसेवाडी येथे होळीच्या आदल्या दिवशी क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमाची सुरुवात रेवदंडा ग्रामपंच्यायत सरपंच व पाचकलशी माळी समाज अध्यक्ष यांनच्या हस्ते जोगेश्वरी मंदिर सप्तआसरा देवी मंदिर व क्रीडागण येथे नारळ फोडून झाली गावातील सर्व प्रतिष्ठित पंच प्रमुख यांना पुष्पगुच्छ देण्यात आले.

हा कार्यक्रम गावातील तरुण युवक सचिन घरत, निलेश घरत, केतन पाटील, प्रशांत पाटील, प्रशांत घरत, संकेत घरत यांनी गावातील सर्वांना एकत्र आण्यासाठी गावातील पंच प्रमुखाना विश्वासात घेऊन हा कार्यक्रम चालू केला आहे

संगीत खुर्ची, चमचा गोटी, क्रिकेट ह्या कार्यक्रमात लहान मुला पासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व भाग घेतात बक्षीस समारंभ सुरेश घरत यांच्या हस्ते गेली सात वर्ष केला जातो याचे वयक्तिक बक्षीस प्रोस्ताहन पर वेगळे असते. त्या कार्यक्रमास सुरेश घरत, विनोद घरत, मनोज घरत, भास्कर घरत, अनिल घरत, रामचंद्र पाटील, मधुकर नाईक, संतोष घरत, प्रभाकर घरत, विलास घरत, सुभाष घरत, अशोक पाटील, राकेश परकर, रवींद्र परकर, सुजित घरत, विराज घरत, साहिल घरत, संतोष म्हात्रे, सौरव घरत, यश म्हात्रे असे अनेक मान्यवर ग्रामस्त उपस्थित होते.

२०० ग्रामस्थांनी ह्या कार्यक्रमात भाग घेतला. सूत्रसंचालन निलेश घरत यांनी केले. सर्वांना कॉफी, नाश्ता देऊन आलेल्या सर्वांचे निलेश घरत यांनी आभार मानले व कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# श्री धावीर स्वराज्य मंडळातर्फे शिवजयंती



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे घोसाळे या गावातील श्री धावीर स्वराज्य मंडळ तळवली या मंडळांने ६ मार्च रोजी शिवजयंती व मशाल यात्रा किल्ले रायगड ते तळवली रोहा अशी आयोजित केली होती.

शिवजयंती व मशाल यात्रा मध्ये गावातील सर्व ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ तसेच तरुण शिवभक्त सहभागी झाले होते. मशाल यात्रेसाठी सर्व शिवभक्त सायंकाळी ५ मार्च रोजी किल्ले रायगड कडे रवाना होऊन सकाळी ६ मार्चला शिवज्योत तळवली गावात आणली. सायंकाळी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

श्री धावीर स्वराज्य मंडळ हे मंडळ रजिस्टर असून यानिमित्ताने अनेक सांस्कृतिक, शैक्षणिक,व सामाजिक उपक्रम राबवतात. शिवजयंतीचा संपूर्ण कार्यक्रम मंडळाचे अध्यक्ष श्री अनिल तुकाराम घाग, उपाध्यक्ष श्री नवनीत चंद्रकांत सावंत व सचिव श्री विशाल गोपाल सावंत, संपूर्ण कमिटी यांच्या उपस्थितीमध्ये पार पाडला.

# स्मिता काळे यांना पुरस्कार



**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिंदे शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यात रायगड जिलहयातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या स्मिता काळे यांना सत्यशोधक मुक्ता साळवे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले..

पुणे येथील इतिहास संशोधन केंद्रात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. यावेळी शिंदे प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विनोद शिंदे, सरचिटणीस सुमन शिंदे, राज्याच्या समाज कल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ मुंडे आदी उपसथित होते. अध्यक्षस्थानी राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर होते.

काळे यांनी अनेक समाजातील घटकांसोबत काम करत नावलौकिक मिळवला आहे.

# एलएलबी विद्यार्थ्यांची नेरळ पोलीस ठाण्याला शैक्षणिक भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पोलिस प्रशासनाची प्रत्यक्ष कार्यपद्धती समजावी या उद्देशाने आचार्य मंजुनाथ लॉ कॉलेज, शेलू येथील विद्यार्थ्यांनी नेरळ पोलीस ठाण्याला शैक्षणिक भेट दिली. या भेटीत तीन वर्षे व पाच वर्षे अशा दोन्ही अभ्यासक्रमातील एलएलबीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.



या वेळी नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक राहुल वरोटे यांनी विद्यार्थ्यांना पोलिस ठाण्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची नोंद प्रक्रिया, तक्रार नोंदविणे, एफआयआर दाखल करणे, आरोपीला अटक करण्याची प्रक्रिया, न्यायालयीन कोठडी व पोलीस कोठडी, तसेच आरोपीला जेलमध्ये पाठविण्याची पुढील कायदेशीर कार्यवाही याबाबत सविस्तर माहिती दिली. गुन्ह्याचा तपास कशा पद्धतीने केला जातो, पंचनामा, पुरावे गोळा करणे आणि न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया याविषयीही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महिला पोलिस अधिकारी प्राची पांगे यांनी महिला अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाड, सायबर गुन्हे तसेच महिलांशी संबंधित गुन्ह्यांबाबत पोलिसांकडे येणाऱ्या तक्रारी व त्यावरील कारवाईची माहिती दिली. महिलांसाठी उपलब्ध असलेल्या हेल्पलाईन सेवा व संरक्षणाच्या उपाययोजनांबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी पोलिस ठाण्यातील स्टेशन डायरी, गुन्हे नोंदवही, तपास प्रक्रिया तसेच पोलिस ठाण्यातील विविध विभागांची माहिती प्रत्यक्ष पाहून घेतली. विद्यार्थ्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधत विविध कायदेशीर प्रश्न विचारले व त्यांची उत्तरेही जाणून घेतली.

यावेळी कॉलेजचे प्राचार्य ॲड. किशोर गायकवाड, तसेच शिक्षक किर्ती बदले उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही शैक्षणिक भेट दिली. कर्जत तालुका शिक्षणाचे केंद्र म्हणून वेगाने विकसित होत असताना नेरळजवळील शेलू येथे सुरू झालेले आचार्य मंजुनाथ लॉ कॉलेज हे कायद्याच्या शिक्षणासाठी महत्त्वाचे ठरत आहे. या महाविद्यालयात तीन वर्षे व पाच वर्षे अशा दोन्ही अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना दर्जेदार कायदे शिक्षण दिले जात असून अनेक विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. संस्थेचे सर्वेसर्वा मंजुनाथ आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल होत असून विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे. असा संदेश यावेळी देण्यात आला.

# कशेळे ग्रामीण रुग्णालयाला मिळणार अत्याधुनिक रुग्णवाहिका

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथे पस्तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय आहे. आजूबाजूच्या किमान शंभर गावातील रुग्णाना अत्यावश्यक उपचारासाठी या रुग्णालयात यावे लागते. रात्री अपरात्री गर्भवती महिला, साप-विंचू चावलेले रुग्ण, हृदय विकार रुग्ण आदींना प्राथमिक उपचारासाठी कशेळे रुग्णालय गाठावे लागते. खूप वेळा रुग्णांची बिकट अवस्था असल्यास त्यांना उल्हासनगर किंवा नवी मुंबई येथे हलवणे गरजेचे असते. परंतु येथे कधीही वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने रुग्णांचे हाल होतात.

कशेळे येथून जाणारा समृद्धी महामार्गाचा मुरबाड कर्जत जोड रस्ता किंवा इतर राज्यमार्गावर अनेकदा अपघात होत असतात. वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने गंभीर जखमींना अनेकदा रस्त्यातच तडफडून जीव गमवावा लागतो. शनिवार दिनांक सात मार्च रोजी कशेळे वाकडा पूल येथे मालू लक्ष्मण ढोले, आणी हरीचंद्र मालू ढोले या पीता पुत्रांची मोटारसायकल गाईला धडकली. या अपघातात मालू ढोले यांचा जागीच मृत्यू झाला. हरिचंद्र ढोले याला कशेळे येथील पोलीस कॉनस्टेबल राहुल जाधव, पोलीस कॉन्स्टेबल हर्ष हंबीर यांनी तातडीने कशेळे ग्रामीण रुग्णालयात आणले. येथील डॉ. प्रतीक झेंडे यांनी त्यांना प्राथमिक उपचार केले. मालू यांची परिस्थिती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारा करिता कामोठे येथे नेणे गरजेचे होते. या करिता डॉ. झेंडे यांनी १०८ या रुग्णावाहीकेसाठी फोन केला, परंतु गाडी नादुरुस्त असून ती कुठेही बंद पडेल असे सांगून जखमीना नेण्यास नकार दिला. डॉ. झेंडे यांनी अनेक ठिकाणी फोन केल्या नंतर खूपच उशीरा गाडी उपलब्ध होऊन जखमीला कामोठे येथे नेण्यात आले.

अनेक अपघातात जखमींची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कशेळे येथील ग्रामस्थ उदय पाटील, रमेश मते, डॉ. गणेश ठोंबरे. सचीन राणे, राजू हरपुडे, बाळा राणे, पांडुरंग भोईर, शंकर फुलावरे यांनी डॉक्टरां बरोबर चर्चा करून रुग्णालयातील समस्यांचा आढावा घेतला. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांना फोन केला असता त्यांनी आमदार निधीतून तातडीने रुग्णावाहिका खरेदी करून कशेळे रुग्णालया साठी देण्यात येईल, असे आश्वासन दिले. आमदारांच्या आश्वासनानुसार आगामी काळात गंभीर रुग्णाना नक्कीच दिलासा मिळणार आहे.

# झोतीरपाडा कोळीवाड्यात विविध उपक्रमांतून शिवजयंती

**पाली : प्रतिनिधी**

जगातील महान राजे म्हणून अलौकिक दिव्य पराक्रम व कर्तृत्व गाजविलेल्या हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार ३९४ वा जयंती सोहळा शिवभक्तांकडून उत्साही वातावरण व प्रेरक उपक्रमातून साजरा करण्यात आला.

शिव तेज मित्र मंडळ झोतिरपाडा - कोळीवाडा यांच्या वतीने शिवजयंती चे औचित्य साधून किल्ले रायगड ते गावी पायी धावत शिवज्योत मशाल आणण्यात आली. दरवर्षी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून तरुण, ग्रामस्थ व शिव प्रेमी यांच्या पुढाकाराने आणण्यात येते. यावर्षीही हातात धगधगती शिवज्योत, खांद्यावर भगवा ध्वज, डोक्यावर रखरखत्या सूर्याची काहिली, आणि मुखात जय शिवराय, जय जिजाऊ, जय भवानी चा जयघोष करीत ढोल ताशांच्या गजरात शिवज्योत आणण्यात आली.




या शिवज्योतीचे मोठ्या भक्तिभावाने जागोजागी स्वागत करण्यात आले.

या साहसी उपक्रमात सिद्धेश भोय, बाळू पाटील, राम पाटील, रिंकू तरे, योगेश तरे, दिपेश भोय, निशांत तरे, धीरज कोळी, देवर्ष कोळी, आशुतोष पाटील. भार्गव तरे, मनोज कुथे, भारत कुथे, रोहन पाटील, विराज पाटील, रोशन पाटील, राज भोय, स्वराज पाटील, दीपक कुथे, किरण कुथे , साजन कुथे, प्रमय पाटील, सरिता पाटील, आदींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

शिवजयंती निमित्त विविधांगी वेशभूषा, व अन्य प्रेरक कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते अशोक भोय, संतोष कोळी, मोहन भोय, विजय भोय, महेंद्र तरे, पुंडलिक कोळी, संजय भोय, सुनील पाटील, भास्कर कोळी, निखिल पाटील, मोहन पाटील, यदिश कुथे, पविन कोळी, हितेश भोय, सुनील कुथे, सोपान भोय, कमलाकर कोळी, दिपेश भोय, दत्ता तरे, प्रमोद तरे, प्रशांत तरे, देवश तरे, राजा तरे,ओम प्रकाश भोय, सदानंद तरे आदी उपस्थित होते.



**खोपोली : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आणि नगरसेवक-नगरसेविकांनी शीळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन केले.**



**माणगाव : बच्चेकंपनीने रंगपंचमी उत्साहात साजरी केली.**

# पुढील लक्ष्य ऑलिम्पिक सुवर्णपदक!

## विश्वविजेतेपदानंतर सूर्यकुमार यादवची ‘मन की बात’



**मुंबई : प्रतिनिधी**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने छोट्या फॉरमॅटमध्ये मोठा धमाका करत तिसऱ्यांदा टी-२० वर्ल्डकप ट्रॉफी उंचावली. भारतीय संघाने सलग दुसऱ्या जेतेपदासह घरच्या मैदानात ही स्पर्धा जिंकण्याचा मोठा डावही साधला. या ऐतिहासिक विजयावर समाधान व्यक्त करताना सूर्यकुमार यादवने आता ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकायचे हाच ध्यास आहे, असे बोलून दाखवले.

फायनलमध्ये बाजी मारल्यावर सूर्यकुमार यादव याने पत्रकार परिषदेत यंदाच्या हंगामातील प्रवास अन् मिळालेले यश यावर भाष्य केले. कॅप्टन्सीत पहिल्यांदा टी-२० वर्ल्डकप ट्रॉफी जिंकणे हा अतिशय सुंदर आणि अविस्मरणीय क्षण आहे. अहमदाबादच्या मैदानात मिळवलेल्या यश हे सांघिक यश असल्याचेही सूर्यकुमारने अधोरेखित केले.

यंदाच्या हंगामातील स्पर्धेतील महिन्याभराचा प्रवास खूपच खास होता. सुरुवात जशी आम्हाला हवी होती तशी झाली नाही, पण तो खेळाचा भाग असतो. शेवटी हा संपूर्ण प्रवास आमच्यासाठी अविस्मरणीय ठरला. संघ म्हणून आम्ही जे साध्य केले आहे ते सर्वांसमोर आहे. त्यामुळे आम्ही खूप आनंदी आहोत. पुढील लक्ष्य अर्थातच ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक पटकवण्यासह त्याच वर्षी (२०२८) होणारा टी-२० वर्ल्डकप असेल, असे सूर्यकुमारने सांगितले.

भारतीय कर्णधाराने सांगितले की, २०२४च्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेपासून संघाच्या खेळण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला. त्या वेळी संघाने अधिक आक्रमक आणि आधुनिक क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. त्यामुळे मोठ्या स्पर्धांमध्ये सातत्याने यश मिळत आहे. हीच सवय पुढेही कायम ठेवायची आहे, असेही तो म्हणाला आहे.

### निवृत्तीच्या प्रश्नावरही फटकेबाजी

अंतिम सामन्यानंतर पत्रकार परिषदेत कर्णधार सूर्यकुमार यादवने त्याच्या निवृत्तीबद्दलही उत्तर दिले. २०२४च्या टी-२० विश्वचषकानंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांनी निवृत्ती घेतली होती. तीन दिग्गज खेळाडूंच्या निवृत्तीनंतर एक नवीन संघ तयार करण्यात आला होता आणि सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली होती. त्याने निवृत्तीबद्दलच्या प्रश्नांवर हसून उत्तर दिले, भावा, निवृत्तीचा विचार का करायचा? सगळं काही ठीक चाललंय.

# ऐरोलीत माइंडस्पेस इकोरन २.० मॅरेथॉन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ऐरोली येथे रविवारी (दि.८) आयोजित करण्यात आलेल्या माइंडस्पेस इकोरन २.० मॅरेथॉनमध्ये चार हजारहून अधिक महिला-पुरुष धावपटूंनी सहभाग घेतला. सलग दुसऱ्या वर्षी आयोजित या उपक्रमाचे आयोजन माइंडस्पेस आरईआयटीने रेडिओ मिर्चीच्या सहकार्याने केले होते.

स्पर्धा ५, १० आणि २१ किमी गटात घेण्यात आली. स्पर्धेसाठी गिन्नी वेड्स सन्नी २ या चित्रपटातील कलाकार अविनाश तिवारी आणि मेधा शंकर उपस्थित होते. अभिनेत्री डेजी शाहसुद्धा यात सहभागी झाली, तर रेडिओ मिर्चीची आरजे प्रेरणा हिने सूत्रसंचालन केले.

विजेत्यांना रोख रकमेची पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी माइंडस्पेस आरईआयटीचे सीईओ आणि एमडी रमेश नायर यांनी या पर्यावरणपूरक आणि तंदुरूस्ती जपणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती देऊन सहभागी सर्व स्पर्धकांचे आभार मानले.






# ‘रन फॉर हर’ कन्याथॉनला प्रतिसाद

## नारीशक्तीच्या उज्ज्वल भविष्यासाठी कर्जतकर धावले

**कर्जत : प्रतिनिधी**

महिलांच्या शिक्षण आणि सशक्तीकरणासाठी यंदाही कन्याथॉन या विशेष मॅरेथॉनचे आयोजन रविवारी (दि.८) आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि विजयभूमी युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. ’रन फॉर हर’ या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेत तब्बल तीन हजार कर्जतकर धावले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कर्जतजवळील पोसरी येथे कन्याथॉनचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीचे हे स्पर्धेचे पाचवे वर्ष होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जम्मू काश्मीरचे चीफ ऑफ पीटीआय अनिल भट्ट आणि आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल खेळाडू यादवेंदर सिंग यांची विशेष उपस्थिती लाभली.

स्पर्धा ३, ५, १० किमी अशा गटांत रंगली तसेच ३ किमी फन वॉक आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात मुली, तरुणींसह विविध वयोगटातील महिलांनीही सहभाग घेतला.

स्पर्धेवेळी माजी पंचायत समिती सदस्य मीना थोरवे, नगरसेवक किशोर कदम, रोहित ओसवाल, माजी सरपंच हर्षद विचारे, डॉ. राजू थोरवे, अनुराधा गोखले, तृप्ती खामकर, अरुण देशमुख, संजय कडू, अशोक आसवले, ज्ञानेश्वर कर्णूक, दिनेश कडू, रवींद्र थोरवे, सुभाषचंद्र नातू, अच्युत कोडगिरे, मुकुंद टुमणे, विजयकुमार धारप, दिनेश रणदिवे, सुनील दानवे, कृष्णा लाड, योगेश थोरवे, भूषण पिंपरकर आदी उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विजय भूमी युनिव्हर्सिटी संस्थापक संजय पडोदे, रविकेश श्रीवास्तव, राजू पुजारी, अ‍ॅड. प्रियांका ओझा प्रसाद थोरवे यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. त्याचप्रमाणे फोर्टी-फिफ्टी प्लस क्रिकेट संघटना कर्जत, शिवशंभो युवा हायकर्स कर्जत, दहिवली गाव परिसर विचारमंच, साईनगर गृहनिर्माण संस्था दहिवली आदी संस्थांनी सहभाग नोंदवला.

# ‘आरडीसीए’ची आता महिला प्रीमियर लीग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) वतीने जिल्ह्यातील महिला क्रिकेटच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून महिला रायगड प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेचे आयोजन मार्च व एप्रिल महिन्यात जिल्ह्यातील विविध क्रिकेट मैदानांवर करण्यात येणार असल्याची घोषणा आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांच्या वतीने महिला दिनानिमित्ताने करण्यात आली.




जिल्ह्यातील महिला क्रिकेटचा दर्जा उंचावणे तसेच शहरांसह ग्रामीण भागातील महिलांना क्रिकेट खेळासाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्या खेळाला चांगल्या दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. महिला क्रिकेटपटूंना अधिक खेळाची संधी उपलब्ध व्हाव्यात आणि जिल्ह्यातील प्रतिभावान महिला खेळाडू पुढे याव्यात यासाठी या स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिला खेळाडूंनी आरडीसीएकडे अधिकृत नोंदणी करणे आवश्यक आहे.

महिला रायगड प्रीमियर लीगसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख १५ मार्च आहे. अधिक माहितीसाठी जयंत नाईक (अलिबाग), देवा पाटील, योगेश पवार (पेण), नाना मयेकर (उरण), महेंद्र भातिकरे (रोहा), आवेश चिचकर (महाड), रोहित कार्ले (खोपोली), संदीप जोशी (अलिबाग), रोहित काळे (माणगाव), विनय पाटील (खारघर पनवेल) तसेच आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा आणि जास्तीत जास्त महिला खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत नेहा राठोडला सुवर्णपदक

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कॉमर्स व अकाउंटन्सीच्या तृतीय वर्षात शिकत असलेली विद्यार्थिनी नेहा राठोड हिने राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. यामुळे तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशन, मुंबईच्या वतीने रविवारी (दि.८) आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत नेहा राठोडने मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. नेहाच्या या शानदार कामगिरीची दखल घेत तिला आगामी राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे तसेच फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी नेहाचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# माणगावमध्ये ग्रामीण क्रिकेट स्पर्धा रंगली

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील श्री शिव छत्रपती ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून श्री राम क्रिकेट संघ रामवाडीच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षातील क्रिकेट स्पर्धेचे दहावे पर्व रविवारी (दि.८) जावळी येथील मैदानावर पार पडले. या स्पर्धेत तालुक्यातील १६ ग्रामीण संघांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्‌घाटन स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज तांबे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून वसंत पाटील उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक जावळी संघ, द्वितीय उनेगाव, तृतीय दाखणे आणि चतुर्थ क्रमांक भांदरे संघाने पटकावला.

# क्रिकेट स्पर्धेत नेरळ संघ विजेता

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कर्जत फोर्टी प्लस क्रिकेट संघटना व इलेव्हन स्टार संघ दहिवली आयोजित महिला शक्ती फोर्टी प्लस चषक स्पर्धा नेरळ टायगर्स संघाने जिंकली. वैष्णवी इलेव्हन कर्जत संघ उपविजेता ठरला.

कर्जत दहिवली भागातील बामचा मळा मैदानावर झालेल्या या स्पर्धेत दहा संघ सहभागी झाले होते. महिला क्रिकेटला प्रोत्साहन मिळावे म्हणून शुभारंभाचा प्रदर्शनीय सामना दोन महिला संघ जेएसडब्ल्यू कंपनी डोलवी, पेण आणि वायएससीसी महिला संघ कर्जत यांच्यात खेळवण्यात आला. यामध्ये कर्जत संघाने विजय मिळविला.



स्पर्धेचे उद्‌घाटन मधुकर सुर्वे यांच्या हस्ते झाले. यावेळी गजेंद्र दांडेकर, शिरीष दिघे, महेंद्र निगुडकर, विकास चित्ते, प्रवीण गांगल, विनायक परांजपे, सचिन मनोरे, दिनेश कडू आदी उपस्थित होते. स्पर्धेला नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, कुमेश मोरे, राजाभाऊ कोठारी, नगरसेविका सुचिता खोत, अंजली कडू, हर्षाली गायकवाड, मानसी कानिटकर, राधिका पवार, प्रशांत पाटील, माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, माजी नगरसेविका सुवर्णा निलधे यांनी सदिच्छा भेट दिली.

स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज नितीन मोरगे, उत्कृष्ट गोलंदाज सुनील अहिर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अजय घरत, तर मालिकावीर तानाजी कडू ठरला. यावेळी खेळाडू सानिया खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्त्या अंकिता पवार, सीए परीक्षा उत्तीर्ण आदिती पाठक यांचा सन्मान करण्यात आला.


।। शांतादेवी प्रसन्न ।। ।। श्री गणेशाय नमः ।। ।। श्री कुलदैवत प्रसन्न ।।

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।।

आमच्या येथे श्री कृपेकरून **कै. हिरा हाशा घरत, कै. सिताबाई हिरा घरत व कै. जनार्दन नामा गायकवाड व कै. मथुराबाई जनार्दन गायकवाड यांची नातु**

चि. **विघ्नेश**
(श्री./सौ. नर्मदा विजय हिरा घरत, मु. कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड यांचा कनिष्ठ पुत्र)

चि.सौ.का. **प्रेरणा**
(श्री./सौ. उत्तरा ज्ञानेश्वर दशरथ भोईर मु.पो.घारापुरी, ता.उरण, जि. रायगड यांची कनिष्ठ कन्या)

शुभविवाह सोहळा

**मिती फाल्गुन कृ ९., शके १९४७, गुरुवार दिनांक १२/०३/२०२६ रोजी सायं. ०५ वा. ०० मिनिटांच्या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. कार्य सिद्धिस नेण्यास श्री समर्थ आहेत. तरी या पवित्र मंगल समयी आपल्या प्रेमळ सदिच्छांचा आणि आशिर्वादाचा वर्षाव या मंगल सोहळ्यास लाभावा, म्हणून आपणांस हे प्रेमाचे, अगत्याचे व आग्रहाचे आमंत्रण !**

**आपले नम्र**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विजय हिरा घरत | सौ. नर्मदा विजय घरत | श्री. चिंतामण जानु घरत | सौ. वंदना चिंतामण घरत |
| श्री. जयवंत जानु घरत | सौ. मालती जयवंत घरत | श्री. नरेश जानु घरत | सौ. संगिता नरेश घरत |
| श्री. विनायक जानु घरत | सौ. काजल विनायक घरत | श्री. विक्रांत विजय घरत | सौ. निशा विक्रांत घरत |
| श्री. देवेंद्र अशोक घरत | सौ. अश्विनी देवेंद्र घरत | श्री. रामदास पांडुरंग ठाकूर | सौ. सावित्रा रा. ठाकूर |
| श्री. प्रणित चिंतामण घरत | सौ. तेजल प्रणित घरत | श्री. गणपत पांडुरंग ठाकूर | सौ. राधाबाई ग. ठाकूर |
| श्री. प्रतिक चिंतामण घरत | सौ. विनीता प्रतिक घरत | श्री. मदन दगडु म्हात्रे | सौ. रंजना मदन म्हात्रे |
| श्री. भगवान अंबाजी म्हात्रे | सौ. इंदुमती भगवान म्हात्रे | श्री. गुरूनाथ काशिनाथ म्हस्कर | सौ. ललिता गुरूनाथ म्हस्कर |
| श्री. जगदिश काळुराम म्हात्रे | सौ. वनिता जगदिश म्हात्रे | श्री.संदेश हरिभाऊ जितेकर | सौ. सोनाली संदेश जितेकर |

**प्रमुख पाहुणे**

| | |
|---|---|
| लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब (मा. खासदार) | मा. श्री. प्रशांत दादा ठाकूर साहेब (आमदार, पनवेल विधानसभा) |
| मा. श्री. महेश बालदी साहेब (आमदार, उरण विधानसभा) | मा. श्री. विक्रांत पाटील साहेब (आमदार विधान परिषद, पनवेल) |
| मा. श्री. नितिनभाई पाटील (महापौर, प.म.न.पा) | मा. श्री. जे. एम. म्हात्रे (माजी नगराध्यक्ष, प.न.पा) |
| मा. श्री. अरूणशेठ भगत (सदस्य, महाराष्ट्र प्रदेश का.रा.प.) | मा. श्री. अविनाश कोळी (अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भा.ज.पा) |
| मा. श्री. परेश ठाकूर (मा. गट नेते, पनवेल मनपा) | मा. श्री. वाय. टी. देशमुख (प्रवक्ता, भा.ज.पा.रा.जि ) |
| मा. सौ. रत्नप्रभा घरत (मा. सदस्य, पं. समिती) | मा. श्री. महेंद्रशेठ घरत (अध्यक्ष, इंटक) |
| मा. सौ. निकिता निलेश खारकर (सदस्य, जि. प. गव्हाण | मा. श्री. प्रितम जे. म्हात्रे (माजी विरोधी पक्ष नेता, प.न.प) |
| मा. सौ. जिज्ञासा कोळी (सदस्य, पंचायत समिती गव्हाण) | मा. श्री. वितेश म्हात्रे (सदस्य पंचायत समिती, वहाळ) |
| मा. श्री. चंद्रकांत गुप्ता (जनरल मॅनेजर रेमंड) | मा. श्री. हरीभाऊ काळूराम पाटील (गव्हाण) |
| मा. श्री. राजेंद्र पडते (जेष्ठ नेते) | मा. श्री. रघुनाथ शेठ घरत (शेलघर) |
| मा. श्री. गिगाराम चौधरी (कुबेर ग्रुप) | मा. सौ. माईताई प्रकाश भोईर (माजी सरपंच, गव्हाण) |
| मा. सौ. योगिता सुहास भगत (अध्यक्षा उलवेनोड २) | मा. श्री. प्रकाश खोपकर (मा. खा. सचिव, रा.म. भारत सरकार) |
| मा. श्री. अनिल पांडुरंग भगत (मा. नगरसेवक) | मा. श्री. जिगनेश भाई (नक्षत्र ग्रुप) |
| मा. सौ. सुचिता प्रेमनाथ ठाकूर (सरपंच धुतूम) | मा. श्री. के. के. गायकवाड (मा. सरपंच रोडपाली) |

**हळदी समारंभ**
बुधवार दि.११/०३/२०२६
सकाळी ०९.१५.वा.

**सत्यनारायणाची पुजा**
शनिवार, दि. १४/०३/२०२६
सायंकाळी ०४.३० वा.

**विवाह स्थळ**
श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय मैदान
गव्हाण-कोपर (सेक्टर ८ ई)
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड

**निमंत्रक**
श्री. विजय हिरा घरत (मा.उपसरपंच, गव्हाण)
श्री. चिंतामण जानु घरत
श्री. विक्रांत विजय घरत


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com